cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–५१ शनिवार दि.१ जून २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### निसर्गावर खापर फोडून मोकळे, एवढेच यांचे काम..!

दरवर्षीचा दुष्काळ व पाणीटंचाई ही आपल्या पाचवीला पुजलेली असल्याने ती जशी आपल्या सवयीची झालीय तशीच ती राज्यकर्ते, राजकीय पक्ष, यंत्रणा, प्रशासन व दुष्काळ, टंचाईचा राज्यात निर्माण झालेला 'लाभार्थी वर्ग' यांच्याही सवयीची झाली आहे. जो तो आपापल्या परीने या दुष्काळ वा टंचाईचा लाभ उठवत असतो. सत्ताधारी आपले राजकीय हित साधण्यासाठी दुष्काळात घोषणांचा पाऊस पाडून आपणास सामान्यांची किती कणव आहे

### मुंबईसह, ठाण्यात मान्सून पूर्व पावसाचा यलो अलर्ट

मुंबई : गरमीने हैराण झालेल्या जनतेसाठी मान्सून संदर्भात आनंदाची बातमी आहे. मान्सून वेळेआधीच केरळात धडकला आहे. त्यामुळे आता मुंबईतही येत्या काही दिवसात मान्सूनची चाहूल लागण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यात मान्सून पूर्व पावसाची हजेरी लागण्याची शक्यता आहे. शनिवारी आणि रविवारी या भागात जोरदार पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे.

# गुजरात-कर्नाटकचा मार्ग मोकळा मग महाराष्ट्रावर बंधन का?

## » कांदा निर्यातीवरून भुजबळांचा सरकारला घरचा आहेर

नाशिक । प्रतिनिधी

केंद्र सरकारने कर्नाटकच्या बंगलोर रोझ कांदा निर्यातीवरील निर्यातशुल्क हटवले आहे. परंतु महाराष्ट्रातील उन्हाळ कांद्यावर ४० टक्के निर्यातशुल्क कायम आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. त्यावरून राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी शुक्रवारी (ता.३१) कांदा प्रश्नावरुन सरकारला घरचा आहेर दिला. गुजरात आणि कर्नाटकचा मार्ग मोकळा मग महाराष्ट्राचा मोकळा व्हायला पाहिजे. कांदा निर्यात प्रश्नी दिल्लीश्वराशी



आणि उपमुख्यमंत्री फडणवीसांशी बोलणार असल्याचे भुजबळ म्हणाले.

नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत येथील सभेत भुजबळ यांनी पंतप्रधान मोदींना कांदा प्रश्नी पत्रही दिले होते. त्याचाही उल्लेख भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना केला. भुजबळ म्हणाले, गुजरातच्या सफेद कांद्याच्या निर्यातीला परवानगी दिली. आता बंगलोर रोझ कांद्याच्या निर्यातीला परवानगी दिली आहे. याबाबत फडणवीस यांच्यांशी आपण बोलणार आहोत. एका बाजूला गुजरात आहे, दुसऱ्या बाजूला कर्नाटक आहे, त्यांचा रस्ता मोकळा होतो.

◀◀ पान २ वर

### निर्यात शुल्काची पाचर

केंद्र सरकारने निर्यात बंदी उठवली आहे. परंतु कांद्यावर ५५० डॉलर किमान निर्यात मूल्य आणि ४० टक्के निर्यात शुल्काची पाचर मारली आहे. प्रमुख कांदा बाजारात कांद्याचे दर दबावात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना आहे. गुजरात आणि कर्नाटकच्या कांद्याला मोकळीक देता येते तर मग महाराष्ट्राला का नाही? असा सवाल शेतकरी विचारत आहेत.

# सामाजिक सलोखा जपण्यासाठी संत-महंतांनी पुढाकार घ्यावा

## निकाल काहीही लागो, शांतता राखणे तरुणांचीच खरी जबाबदारी





बीड । प्रतिनिधी

गेल्या एक ते दीड महिन्यापासून बीड जिल्हा लोकसभा निवडणूकीच्या काळात सामाजिक दरीमध्ये धुमसत आहे. गावागावातील वातावरण पाहिले तर आजही सर्वजण गुण्यागोविंदाने एकत्र राहत आहेत. मात्र सोशल मिडीयावर काही उनाड मुलांमुळे हा उद्रेक झाला. आता सर्वांनी जागृत होण्याची वेळ आली असून जिल्हयातील संत-महंतांनी ४ जूनच्या मतमोजणीच्या पार्श्वभुमीवर तरुणांना सामाजिक एकोप्याचा संदेश देण्याची गरज आहे. लोकसभा निवडणुकीत कोणीही विजयी झाले आपल्या घरातील आर्थिक अडचण मिटणार नाही, नौकरी लावणार नाही, बहिणीच्या लग्नाचा खर्च भागवणार नाही, त्यामुळे आता तरी जागे व्हा, आणि तिरस्कार सोडा, असे आवाहन सामान्य नागरीकांनी केले आहे. लोकसभा निवडणुक लागल्यापासून

◀◀ पान २ वर

### व्हिडीओच्या माध्यमातून द्यावा संदेश

जिल्ह्यातील संत-महंतांनी आपला ३-५ मिनिटांचा सामाजिक सलोखा राहण्याबाबतचा संदेश एका व्हिडीओच्या माध्यमातून द्यावा. हा संदेशपर व्हिडीओ माध्यमांसह सोशल मिडीयावर टाकला तर याचा परिणाम जिल्हयातील तरुणांवर निश्चितच होणार आहे. त्यासाठी जिल्हयातील सर्व संस्थान, तिर्थक्षेत्र, गड यांच्या मठाधिपती यांनी पुढाकार घेऊन व्हिडीओच्या माध्यमातून सामाजिक सलोखा राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

### पीआय शितलकुमार बल्लाळ यांचे प्रयत्न



बीड शहर ठाण्याचे पीआय शितलकुमार बल्लाळ यांनी ४ जूनच्या मतमोजणीच्या दृष्टीने सामाजिक एकोपा रहावा यासाठी संत-महंतांनी एक संदेश द्यावा, यासाठी पुढाकार घेतला. त्यांनी अनेक संत-महंतांना प्रत्यक्ष बोलून विनंती केली. त्यांच्या विनंतीला मान देत सर्व महंतांनी होकार दिला आहे.

# विधानसभेला २८८ उमेदवार उभे करणार

## मनोज जरांगेंची घोषणा

पुणे । प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीत तटस्थ राहणाऱ्या मनोज जरांगे यांनी आता विधानसभा निवडणुकीत २८८ उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा केली आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण न मिळाल्यास आपण २८८ मतदारसंघातून सर्व जाती-धर्माचे उमेदवार उभे करणार असल्याचं जरांगे यांनी म्हटले.**



मनोज जरांगे एका जुन्या खटल्यासंदर्भात शुक्रवारी पुणे न्यायालयात आले होते. त्यानंतर, पत्रकारांशी बोलताना त्यांनी ४ जूननंतर उपोषण करणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच, मराठा आरक्षण, बीड लोकसभा, जातीवाद आणि उपोषणावरही त्यांनी भाष्य केले. यावेळी, विधानसभा निवडणूक लढवण्यासंदर्भात त्यांनी मोठी घोषणा केली. जर मराठा समाजाला ओसीबीतून आरक्षण मिळाले नाही, तर विधानसभेला २८८ मतदारसंघातून उमेदवार उभे करणार

◀◀ पान २ वर

### शेवटच्या टप्प्यातल्या ५७ जागांसाठी आज मतदान

नवी दिल्लीः लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या सातव्या टप्प्यात ८ राज्य व केंद्रशासित प्रदेशातील एकूण ५७ मतदारसंघात रविवारी (दि.१) रोजी मतदान होणार आहे. या मतदानासाठी निवडणूक आयोगाने संपूर्ण तयारी केली आहे. मतदान होणाऱ्या ठिकाणी मतदानकेंद्रे तयार करण्यात आली असून तिथे कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. शेवटच्या टप्प्यात १० कोटी ६ लाख मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामध्ये ५ कोटी २४ लाख पुरुष आणि ४ कोटी २८ लाख महिला मतदारांचा समावेश आहे. अखेरच्या टप्प्यात पंजाब आणि उत्तर प्रदेशातील सर्वाधिक १३ जागांवर मतदान होत आहे. याशिवाय पश्चिम बंगाल (९), बिहार

◀◀ पान २ वर

# मोदी स्टंटबाज, यावेळी पंतप्रधान होणार नाहीत – प्रकाश आंबेडकर

बुलढाणा। प्रतिनिधी

मोदी स्टंटबाज आहेत, यावेळी मोदी पंतप्रधान होणार नाहीत, असे वक्तव्य वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. स्वतःच्या आई वडिलांना शिव्या देण्याची कला फक्त मोदींकडेच आहे. निवडणुकांच्या निकालावर सध्या कुणीही बोलू शकत नाही, अशी परिस्थिती आहे. मतदाराने काय केले आहे, ते मतदार बोलायलाच तयार नाही. पण, यावेळी मोदी हे पंतप्रधान होणार नाहीत ही वस्तुस्थिती आहे, असे आंबेडकरांनी म्हटले आहे.

◀◀ पान २ वर

# जादा दराने बियाणांची विक्री करणाऱ्या कृषी दुकानदारावर गुन्हा दाखल

माजलगाव। प्रतिनिधी

शहरातील जुना मोंढ्यात शेतकऱ्यांना बियाणे विक्रीचा कोणत्याही प्रकारचा परवाना नसतानां शेतकऱ्यांना कापसाच्या बियाणांची एम.आर.पी.पेक्षा जास्त दराने विक्री करणाऱ्या महाविर ऑग्रो एजन्सीवर बियाणे निरीक्षक तथा जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक कल्याण सदाशिव आंबुरे यांच्या




फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात फसवणूकीसह जिवन आवश्यक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

यासंदर्भात बियाणे निरीक्षक तथा जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक कल्याण सदाशिव आंबुरे यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत असे म्हटले आहे की, माजलगाव तालुक्यातील जुना मोंढ्यामध्ये महावीर अग्रो एजन्सी येथे जादा दराने

◀◀ पान २ वर

# सत्तेसाठी इंडिया आघाडीच्या हालचाली

## एनडीएतील पक्षांना ओढण्याची रणनीती, आज अनौपचारिक बैठक

नवी दिल्ली । वृतसंस्था

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्याचे मतदान शनिवारी १ जून रोजी पार पडत असतानाच त्याचदिवशी इंडिया आघाडीनेही बैठक बोलाविली आहे. या बैठकीत कुठल्याही आघाडीत नसलेल्या नव्या पक्षांना इंडिया आघाडीत सामील करून घेण्याबाबत रणनीती आखली जाणार आहे. सध्या एनडीए आघाडीचा घटक असलेल्या काही छोट्या पक्षांना इंडिया आघाडीकडे कसे ओढता येईल, याबाबतही बैठकीत चर्चा केली जाणार आहे.



### ४ जून रोजी इंडिया आघाडीची औपचारिक बैठक

निवडणूक निकालाच्या दिवशीच म्हणजे, ४ जून रोजी इंडिया आघाडीची औपचारिक बैठक बोलाविली जाण्याची शक्यता आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी याआधीच चर्चा करून ४ जून रोजी इंडिया आघाडीची बैठक घेण्याची सूचना केली आहे.

निवडणूक निकालानंतर केंद्रात आपलेच सरकार स्थापन होणार असल्याचा इंडिया आघाडीला विश्वास आहे. त्यामुळे सरकार बनविण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. बहुमतासाठी काही जागा कमी पडल्यास एनडीए आघाडीतून बाहेर पडणाऱ्या पक्षांसाठी इंडिया आघाडीचे दरवाजे खुले केले जाणार आहेत. इंडिया आघाडीच्या या बैठकीत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) गटातर्फे स्वतः उध्दव ठाकरे सहभागी होणार नसून त्यांचे प्रतिनिधी हजर राहणार आहेत. ही बैठक अनौपचारिक आहे. निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर इंडिया आघाडीची औपचारिक बैठक घेतली जाणार

◀◀ पान २ वर

# मी झुकणार नाही, उद्या पुन्हा तिहार तुरुंगात जाणार !

## अरविंद केजरीवाल यांचा व्हिडीओ जारी करीत निर्धार

नवी दिल्ली । वृतसंस्था

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी शुक्रवारी सांगितले की, ते आता रद्द करण्यात आलेल्या दारू धोरणाशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात २ जून (रविवार) रोजी तिहार तुरुंगात पोलिसांसमोर आत्मसमर्पण करतील. १० मे पासून अंतरिम जामिनावर बाहेर असलेले केजरीवाल म्हणाले की, डॉक्टरांनी त्यांना सांगितले की त्यांच्या शरीरात ''गंभीर आजाराची'' काही चिन्हे असू शकतात. आपल्याला किती काळ तुरुंगात ठेवले जाईल याची कल्पना नाही. ''देशाला हुकूमशाहीपासून वाचवण्यासाठी'' पुन्हा एकदा तुरुंगात परत जाणार आहे. आपली भावना शुद्ध असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.



कथित दिल्लीतील मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी ऐन लोकसभा निवडणूकीच्या तोंडावर सक्तवसुली अंमलबजावणी अर्थात ईडीने कारवाई करत दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक केली. त्यानंतर लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर अरविंद केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला. त्यावर सर्वोच्च न्यायालयानेही अरविंद केजरीवाल यांना २ जून रोजी पर्यंतचा जामिन मंजूर केला.

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३१ मे २०२४


आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ९.०० क्विंटल | १,९३० | २,५०० | २,२१५ |
| ज्वारी/हायब्रिड :४५.०० क्विंटल | १,७१० | ३,५०० | २,५१९ |
| मूग : १.५० क्विंटल | ५,००१ | ७,१०० | ६,०५० |
| तूर : १०.५० क्विंटल | १०,९०० | १२,०५० | ११,६७५ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| बाजरी: ३९.५० क्विंटल | २,२०० | २,५७५ | २,४२३ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन:२७.५० क्विंटल | ४,५२१ | ४,५२१ | ४,५२१ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |

# अबब! नागपूरात तापमान ५६ अंश सेल्सिअस पार?

नागपूर । प्रतिनिधी

**भारतीय हवामान विभागाने नागपुरात चार स्वयंचलित हवामान केंद्र सुरु केली आहेत. यामधील दोन हवामान केंद्रांमध्ये शुक्रवारी (दि.३१) देशातील आजपर्यंच्या सर्वांत उच्च तापमानाची नोंद झाली आहे. ही गोष्ट नागपूरकरांसाठी धक्का देणारी ठरली आहे. नागपूरमधील महाराजबागेत पिके व्हीच्या केंद्रावर ५६ अंश सेल्सिअस तर सोनेगाव येथील एका केंद्रावर ५४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. हे तापमान उत्तर-पश्चिम दिल्लीतील ५२.६ तापमानापेक्षाही अधिक असल्याने हे तापमानाच्या मोजमापावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.**



उत्तर अंबाझरी रामदासपेठ येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या क्षेत्रात असलेल्या हवामान केंद्रामध्ये तब्बल ५६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. दुसरीकडे सोनेगाव येथील प्रादेशिक हवामान केंद्रामध्ये ५४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. यासोबतच नागपूर – वर्धा रोडवरील खापरी येथील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ कॉटन रिसर्च क्षेत्रामधील हवामान केंद्रावर तापमान ४४ अंश सेल्सिअस दाखवले तर रामटेक

◀◀ पान २ वर




cmyk

अग्रलेख

# निसर्गावर खापर फोडून मोकळे, एवढेच यांचे काम..!


दरवर्षीचा दुष्काळ व पाणीटंचाई ही आपल्या पाचवीला पुजलेली असल्याने ती जशी आपल्या सवयीची झालीय तशीच ती राज्यकर्ते, राजकीय पक्ष, यंत्रणा, प्रशासन व दुष्काळ, टंचाईचा राज्यात निर्माण झालेला 'लाभार्थी वर्ग' यांच्याही सवयीची झाली आहे. जो तो आपापल्या परीने या दुष्काळ वा टंचाईचा लाभ उठवत असतो. सत्ताधारी आपले राजकीय हित साधण्यासाठी दुष्काळात घोषणांचा पाऊस पाडून आपणास सामान्यांची किती कणव आहे, हे सिद्ध करण्यासाठी धडपडत असतात, तर विरोधक सरकार कसे निष्क्रिय आहे हे ठरवण्यासाठी दुष्काळावरून राज्यकर्त्यांवर टीकेची झोड उठवायची संधी साधत असतात. विशेष म्हणजे आलटून-पालटून सत्ता उपभोगणारे हे राजकीय पक्ष आपण सत्तेवर असताना हा दुष्काळ वा टंचाई संपविण्यासाठी कोणते ठोस धोरण राबविले यावर चकार शब्दही काढत नाहीत.

यंत्रणा, प्रशासनासाठी तर दुष्काळ वा टंचाईची स्थिती म्हणजे दिवाळीच. त्यांना अशा स्थितीत कंत्राटदारांकडून न मागता घसघशीत बोनस व वर भेटी मिळते आणि त्यांचे घर भरते. टँकर लॉबी, इतर दुष्काळी कामे करणारी कंत्राटदार लॉबी मालामाल होते. त्यांच्या तुंबड्या भरतातच नव्हे उलथून वाहतात. वर्षानुवर्षे राज्यात हे चित्र आहे आणि सध्याही हेच चित्र राज्यातील सर्वसामान्य जनता उघड्या डोळ्यांनी पाहते आहे. त्यात यावर्षी लोकसभा निवडणुकीच्या 'तेराव्या महिन्या'ची भर पडली. राज्यकर्ते, राजकीय पक्ष, या पक्षांचे नेते-कार्यकर्ते, प्रशासन, यंत्रणा सगळेच निवडणुकीत व्यस्त. त्यामुळे सामान्यांच्या घशाला पडलेल्या कोरडीकडे लक्ष द्यायला उसंत आहे कुणाला? आता राज्यातले मतदान संपल्यावर दुष्काळ व पाणीटंचाईबाबत राज्यकर्त्यांना व विरोधकांना हळूहळू कंठ फुटायला सुरुवात झाली आहे तर त्यात पुन्हा प्रत्यक्ष उपाययोजनांमध्ये आदर्श आचारसंहितेचा खोडा आहे. थोडक्यात लोकशाहीचा महाउत्सव असणाऱ्या निवडणुकीत घशाला कोरड पडलेले लोक वाऱ्यावरच आहेत. दुष्काळ, पाणीटंचाई हा सामान्यांचा जगण्या-मरण्याचा प्रश्न. मात्र, सदैव जनकल्याणाचा वसा घेऊन अहोरात्र सामान्यांसाठी झिजणाऱ्या राजकीय पक्षांच्या प्रचारात केंद्रीय किंवा राज्यपातळीवरील किती नेत्यांनी आपल्या भाषणांमध्ये, मुलाखतींमध्ये, चर्चांमध्ये सामान्यांच्या जगण्या-मरण्याच्या या सततच्या पाणीटंचाईला स्थान दिले? त्याबाबतच्या ठोस धोरण निर्मितीला व धोरणांच्या योग्य अंमलबजावणीस प्राधान्य दिले? हा संशोधनाचाच विषय ठरावा. आज राज्यातील एकूण ३६ पैकी २५ जिल्ह्यांमध्ये म्हणजे दोन तृतीयांश भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. याचे कितपत गांभीर्य राजकीय पक्षांच्या प्रचारात जाणवले? राज्यातील एकूण वस्त्यांपैकी २५ टक्के वस्त्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून आहेत. हा टँकरही रोज येतो असे नाही तर चार-चार दिवस गावकऱ्यांना त्याची प्रतीक्षाच करावी लागते. २०१९ मध्ये आपल्या दुसऱ्या कार्यकाळाची सुरुवात करताना मोदी सरकारने आपल्या अर्थसंकल्पात 'हर घर जल' अशी योजना जाहीर केली होती. मोदींच्या कुठल्याही योजनेस कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या आग्रहानुसार ही योजना पाच वर्षांच्या कालावधीत पूर्ण व्हायला हवी होती. आता निवडणूक संपून नवे सरकार येण्याची वेळ आली तरी राज्यातल्या 'हर घर' मध्ये 'जल' पोहोचलेले नाहीच. म्हणजे राज्यात नळजोडण्या झाल्या पण या नळांमधून पाणी काही येत नाही. जर योजना परिणामकारक व यशस्वी करायची तर नुसते नळ जोडून काय होणार? त्यातून येणाऱ्या पाण्याचीही व्यवस्था करायला हवी. ती झाली असती तर राज्यातील लाखो महिला, मुलांना आज घोटभर पाण्यासाठी हंडे घेऊन वणवण करावी लागली नसती. २०१४ मध्ये सत्तेवर आल्यावर मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाकांक्षी 'जलयुक्त शिवार' योजना जाहीर केली व या योजनेची तेवढ्याच धूमधडाक्यात अंमलबजावणी करण्यात आली. जर ही योजना यशस्वी ठरली असेल तर एव्हाना राज्यातले सगळे शिवार जलयुक्त व्हायला हवे होते आणि त्यातील काही टक्के पाणी राज्याची तहान भागविण्यासाठी पुरेसे ठरले असते. आता या योजनेने नेमके कुणाला तृप्त केले? हा संशोधनाचा विषय ठरला आहे. राज्यात आज सगळ्या धरणांमध्ये मिळून सरासरी २० टक्केही पाणीसाठा नाही. मराठवाड्यातील बहुतांश मोठी धरणे मृतसाठ्यात पोहोचली आहेत आणि मध्यम व लघु प्रकल्प कोरडेठाक पडले आहेत. दरच वर्षी कमी-अधिक प्रमाणात हेच चित्र असताना त्यासाठी निसर्गावर खापर फोडणे थांबवून स्वतःची 'योग्य जलधोरण' तयार करण्याची व त्याची प्रामाणिक अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सर्वपक्षीय राज्यकर्ते कधी स्वीकारणार? हा या घडीचा सर्वांत कळीचा प्रश्न आहे.

## अहिल्याबाई होळकर एक उत्तम शासक होत्या-पप्पू कागदे

बीड । प्रतिनिधी

अहिल्याबाई या स्त्रियांची सेना बनविणाऱ्या पहिल्या महिला होत्या. त्या एक उत्तम शासक आणि पराक्रमी महिला होत्या.होळकर घराण्यात 'तत्वज्ञानी राणी' असा त्यांचा उल्लेख केला जातो. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी व्यक्त केले.



अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार (दि.३१) रोजी बीड शहरातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करतांना, पप्पू कागदे बोलत होते. यावेळी राजू जोगदंड, अविनाश जोगदंड, भैय्यासाहेब मस्के, विलास जोगदंड, अक्षय कोकाटे, रतन वाघमारे, बाळासाहेब गव्हाणे, अप्पासाहेब मिसळे, नागेश शिंदे, भाऊसाहेब दळवी, अक्षय वडमारे, सनी जोगदंड, धम्म पारवे यांची उपस्थिती होती. यावेळी अभिवादन करतांना, पप्पू कागदे म्हणाले की, अहिल्याबाई होळकर यांनी महिला सक्षमीकरण आणि समाज कल्याणासाठी काम केले. त्यांनी महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आणि शिक्षणासाठी केंद्रे स्थापन केली, त्यांच्या विविध क्षेत्रातील सहभागाला प्रोत्साहन दिले, विधवांची स्थिती सुधारण्यात मदत केली. समुदायांमध्ये एकोपा वाढवणे हा नेहमीच त्यांचा प्रयत्न होता. अहिल्याबाई एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. अहिल्याबाई होळकर यांचे समाजातील योगदान आणि त्यांचे पुरोगामी शासन आजही लोकांना प्रेरणा देत आहे. असे मत अहिल्याबाईंच्या जन्मदिनी त्यांच्या स्मृतीला वंदन करतांना पप्पू कागदे यांनी व्यक्त केले.

### अनाथ, बेघरांसोबत बबन वडमारे यांचा सेवापूर्ती सोहळा

## वंचित, शोषित, पिढीत लोकांसाठी पूर्ण वेळ देणार-बबन वडमारे

**बीड । प्रतिनिधी**

आजच्या काळात क्लास-१ चे अधिकारी-कर्मचारी हे त्यांचा सेवापुर्तीचा कार्यक्रम मोठमोठ्या हॉलमध्ये लाखो रुपये खर्च करत नातेवाई, मित्र परिवार यांच्यासोबत साजरा करत असतात परंतु कामगार नेते, प्रादेशिक सचिव इंटक, वाहतूक नियंत्रक बबन वडमारे यांनी कुठलाही दिखावा न करता बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील अनाथ ज्यांचं कोणीच नाही अशांसोबत एक वेळचे गोड जेवण देऊन आपल्या सेवपूर्तीचा कार्यक्रम



साजरा केला. बबन वडमारे यांनी सेवापूर्ती नंतरचे संपूर्ण आयुष्य कामगारांच्या न्याय हक्कासाठी समाजासाठी तसेच चळवळीसाठी पूर्ण वेळ देणार आसल्याचे सांगितले यावेळी राज्य परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक अजयकुमार मोरे, दै.प्रजापत्रचे संपादक सुनील क्षीरसागर, वैभव स्वामी मराठवाडा अध्यक्ष पत्रकार संघ मुंबई, गोकुळ जगताप विभागीय अध्यक्ष इंटक, अक्षय मुळे कार्यकारी संपादक लोकनायक, सामाजिक कार्यकर्त्या पुष्पताई तुरूकमाने, अजय सरवदे, संतोष निकाळजे, लखन जोगदंड, सेवानिवृत्त कर्मचारी बाबा जाधव, महारुद्र मोराळे, जिव्हाळा बेघर केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे, संचालक अभिजित वैद्य, महिला काळजी वाहक छायाताई सरवदे यांच्यासह राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी मित्रपरिवार नातेवाईक उपस्थित होते.

## लोकसभा निकालानंतर राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार, नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता; महामंडळावरही नियुक्त्या होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात मोठे बदल होण्याची शक्यता असून राज्यात मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यामध्ये काही मंत्र्यांची खाती बदलली जातील, तसेच काही नवीन चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ज्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळणार नाही असे नेते नाराज होऊ नयेत म्हणून त्यांची वर्णी महामंडळावर लावण्यात येणार आहे.**

पालकमंत्रिपदांची आदलाबदल

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर हा बदल केला जाणार असून काही पालकमंत्रीपदांचीही अदलाबदल करण्यात येणार असल्याची माहिती आहे. तसेच ज्या महामंडळावर अद्याप कोणतीही नियुक्ती करण्यात आली नाही त्यावरही नियुक्ती केली जाणार आहे. या संदर्भात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यात प्राथमिक चर्चाही झाल्याची माहिती मिळत आहे.

**नवीन चेहऱ्यांना संधी**

स्थानिक राजकारण, जातीय समीकरण आणि सध्याची राजकीय परिस्थिती पाहता नवीन चेहऱ्यांना संधी दिलं जाईल. सध्या अनेक मंत्र्यांकडे दोन-तीन खाती आहेत, त्यामध्ये बदल होऊन विधानसभेच्या संख्याबळानुसार त्याचे वाटप केले जाणार असल्याची माहिती आहे. राज्यपाल नियुक्त १२ आमदारांची निवडही प्रलंबित असून त्याचाही निर्णय होणार असल्याची माहिती आहे. ज्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळणार नाहीत त्यांना महामंडळ देऊन त्यांची नाराजी दूर केली जाणार असल्याची माहिती आहे.

**रिक्त असलेले महामंडळ**

सिडको, महात्मा फुले महामंडळ, आण्णाभाऊ साठे महामंडळ, म्हाडा, अपंग कल्याण, चर्मोद्योग विकास महामंडळा, , महाराष्ट्र औद्योगीकरण विकास महामंडळ, महाराष्ट्र कामगार कल्याण महामंडळ, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, महराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ, महिला अर्थिक विकास महामंडळ, भरत गोगावले, संजय शिरसाठ यांना संधी मिळणार का? राज्यात शिंदे-भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर दोन्ही पक्षाच्या प्रत्येकी नऊ जणांना मंत्रिपदाची संधी मिळाली होती. तेव्हापासून मंत्रिमंडळाच्या विस्ताराची चर्चा सुरू होती. नंतरच्या काळात अजित पवारांची राष्ट्रवादीही सत्तेत आल्याने त्यांनाही नऊ मंत्रिपदं देण्यात आली. त्यामुळे शिंदे गटातील इच्छुक असलेल्या आमदारांना मात्र मंत्रिपदाने हुलकावणी दिली. शिंदे गटाचे भरत गोगावले, संजय शिरसाठ यांच्यासह अनेकजण मंत्रिपदाच्या शर्यतीत सुरूवातीपासूनच आहेत. भरत गोगावले यांनी त्यांची संधी हुकल्याने उघड नाराजी अनेकदा बोलून दाखवली आहे. त्यामुळे येत्या मंत्रिमंडळाच्या विस्तारात त्यांना संधी मिळणार का ते पाहावं लागेल.

## शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृती श्लोक निषेध

**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने नवीन शालेय शैक्षणिक आराखडा २०२४ तयार करण्यात आला आहे. या आराखड्यात विषमतावादी आणि वर्णव्यवस्था निर्माण करणाऱ्या मनुस्मृतीतील श्लोकांचा समावेश करण्याच्या निषेधार्थ परळी शहरातील फुले, शाहू , आंबेडकरी विचाराचा नागरिकांच्या वतीने तहसीलदारांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना शुक्रवार (दि ३१ ) रोजी निवेदन देण्यात आले.

केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने नवीन अभ्यासक्रम आराखडा नुकताच शिक्षण विभागाने प्रकाशित केला आहे. या आराखड्यात शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीतील श्लोक, भगवत गीतेतील तसेच रामदास स्वामी यांचे काही श्लोक समावेश करण्यात येणार आहेत. भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मानवतेला कलंक असणाऱ्या मनुस्मृतीची होळी करून या ग्रंथाचा जाहीर निषेध केला होता.त्यामुळे या ग्रंथातील एकही श्लोक अभ्यासक्रमात समावेश करण्यात येऊ नये. समाविष्ट करायचा असेल तर भारतीय संविधानातील नागरिकांचे अधिकार आणि कर्तव्य, तसेच राष्ट्रसंत तुकोबाराय, संत गाडगे महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आदि महापुरुषांच्या विचारांचा समावेश करण्यात यावा. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संविधानाला अपेक्षित साहित्य अभ्यासक्रमात समाविष्ट करावे अशी मागणीही याप्रसंगी करण्यात आली आहे. मागण्याचे निवेदन यावेळी नायब तहसीलदार रुपनर यांनी स्वीकारले. या निवेदनावर प्रा. दासू वाघमारे, प्रा. विलास रोडे, रानबा गायकवाड, भगवान साकसमुद्रे,मुक्ताराम गवळी, अशोक वाघमारे, प्रा. प्रदीप बुक्तर,शेख मुकरम,कैलास डुमणे, विकास वाघमारे, दीपक शिरसाठ,विजय रोडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पान १वरून...

### गुजरात-कर्नाटकचा मार्ग मोकळा

मग महाराष्ट्राचा रस्तासुद्धा मोकळा करून द्या, अशी मागणी आपण केली पाहिजे. ती रास्त मागणी आहे.'' असेही भुजबळ म्हणाले. दरम्यान, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही कांदा प्रश्नावरून सरकारवर टीका केली. सुळे म्हणाल्या, ''निर्यातबंदी उठवल्याची घोषणा खोटी होती. त्याच्यात काहीच नव्हते. त्यातून कांदा शेतकऱ्यांना दिलासा मिळाला नाही. कर्नाटकात जशी घोषणा झाली तशी देशात व्हावी.'' अशी मागणी सुळे यांनी केली. पुढे त्या म्हणाल्या, ''संसदेत पीयूष गोयल दुष्काळ आणि कांदा प्रश्नावर आठ ते दहा वेळा विचारला. २०२३ च्या ऑक्टोबर महिन्यापासून आम्ही प्रश्न मांडत आलोत. याबद्दलची कल्पना सरकारला दिली होती. पण सरकार अतिशय असंवदेनशील आहे. त्यामुळे अपेक्षा तरी काय करणार.'' असं म्हणत सुळे यांनी खंत व्यक्त केली.

-------

### विधानसभेला २८८

असल्याची घोषणाच जरांगेंनी केली आहे. जरांगेंच्या या घोषणेनंतर त्यांच्या समर्थकांनी जल्लोषही केला. जातीवाद आपल्याला मान्य नाही, मी दोन्ही समाजाला शांत राहण्याचे आवाहन केले आहे. मी जातीविषयी एकदाही बोललो नाही, मी ओबीसी बांधवाला कधीही चुकीचे बोललो नाही. नेतेच काहीही बोलतात, असे म्हणत जरांगे यांनी बीडमधील जातीय तणावावर भाष्य केले. तसेच, पालकमंत्री म्हणून त्यांची जबाबदारी आहे, त्यांनी शांततेचे आवाहन केले पाहिजे, पण ते करत नाहीत, असे म्हणत नाव न घेता जरांगेंनी मंत्री धनंजय मुंडेंवर निशाणा साधला.

-----------

### सामाजिक सलोखा जपण्यासाठी

बीड जिल्हयात मोठी सामाजिक दरी निर्माण झाली आहे, कधी नव्हे ते यावेळी घडले. सोशल मिडीयावर काही मुलांनी चुकीच्या पोस्ट टाकल्यामुळे ही दरी आणखीच वाढत गेली आहे. यातून हाणामाऱ्या, गुन्हे दाखल होणे, बहिष्कार टाकणे असे प्रकार घडले. हे कधीही समाजासाठी आणि बीड जिल्हयाच्या भवितव्यासाठी चांगले नाही. सामाजिक दरी वाढवण्याचे काम काही जण करीत असले तरी गावागावात अजूनही सर्वजण गुण्यागोविंदाने राहत आहेत. जातीवाद हा गाव, शहर यापेक्षा सोशल मिडीयावरच जास्त दिसून आला. आता वादग्रस्त पोस्ट टाकणाऱ्या मुलांवर गावागावातील प्रतिष्ठीत व जेष्ठ नागरीकांनी लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे, त्यामुळे सध्या तशा पोस्टही थांबल्या आहेत. दि. ४ जूनला बीड लोकसभेसाठी मतमोजणी होणार आहे. यावेळी कोणाचाही जय-पराजय झाला तरी सर्वांनी शांतता ठेवण्याची खरी गरज आहे. त्याचे कारणही तेवढेच बोलके आहे. आतापर्यंतचा इतिहास पहा, कोणत्या खासदार किंवा इतर लोकप्रतिनिधींनी तुमचे कर्ज फेडले का?, मुलीचे/बहिणीच्या लग्नासाठी आर्थिक हातभार लावला का?, घर बांधण्यासाठी पैसे दिले का?, शेती सिंचनाखाली आणण्यासाठी काही हातभार लावला का? या बाबींचा विचार करा आणि मगच पुढे काय करायचे ते ठरवा, असे आवाहन सामान्य नागरीकांनी केले आहे. मतमोजणीसाठी सर्वांनी खुल्या दिलाने आणि सामाजिक प्रेमभावाने तयार रहायला हवे. जिल्हयातील संत-महंतांनी सुध्दा आता सामाजिक सलोखा रहावा, यासाठी व्हिडीओच्या माध्यमातून तरुणांना आवाहन केले पाहिजे. भरकटलेल्या तरुणांचा खरा धर्म काय आहे, जबाबदारी काय आहे? जातीपेक्षा मानवतेचे नाते कसे श्रेष्ठ आहे, हे समजावून सांगितले पाहिजे. साधु-संतांची परंपरा असलेला आणि समृध्द असा सामाजिक वारसा असलेला बीड जिल्हा आहे, हे सांगण्याची आणि डोक्यातील जातीचे भुत बाहेर काढण्याची हीच योग्य वेळ आहे. त्यामुळे संत-महंतांनी यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

-----------

### मोदी स्टंटबाज, यावेळी पंतप्रधान

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मोदी स्टंटबाज आहेत. हे आता पूर्णपणे लक्षात आले आहे. त्यांनी स्वतःला देव सुद्धा म्हटले आहे आणि स्वत:च्या आई-वडिलांना शिव्या देण्याची कलाही त्यांच्याकडे आहे. त्यामुळे एका देवाने दुसऱ्या देवाकडे साकडे घालावे हा स्टंट सुद्धा नरेंद्र मोदीच करू शकतात. त्यामुळे लोकांनी एक करमणूक म्हणून त्याच्याकडे पाहावे यापेक्षा काहीही नाही. दिल्लीत वर्षभर हमीभाव मिळावा म्हणून आंदोलन चालले. एकाही राजकीय पक्षाने हमीभाव देऊ, अस आपल्या अजेंड्यात म्हटले नाही. मग शेतकऱ्यांनी त्यांना मतदान का केले? सामान्य माणसाला रोजच्या प्रश्नांशी काही घेणे-देणे नाही त्याला चिंता आहे, ती सत्ता ही माझ्या समाजाच्या माणसाला मिळावी, हे त्याचे महत्त्व, असेही प्रकाश आंबेडकरांनी म्हटले आहे.

---------

### जादा दराने बियाणांची विक्री करणाऱ्या

कापसाचे बियाणे विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावर जिल्हा भरारी पथकातील कृषी विकास अधिकारी,जिल्हा परिषद,बीड श्री.एस.डी.गरंडे यांना सांगून त्यांचे समवेत माजलगाव येथे दि.३० मे गुरुवार रोजी दुपारी १:०० वाजता हजर झालो.याबाबतची माहिती तालुका कृषी अधिकारी, माजलगाव एस. एस.संगेकर व तंत्र अधिकारी, माजलगाव श्री.जे.बी.भगत यांना दिली तसेच सोबत श्री.चेतन विठ्ठल कांबळे,वय ३२,व्यवसाय नोकरी व श्री.गजानन अशोक राजरपन्न, वय-२५,व्यवसाय-नोकरी यांना बोलावले माहविर अँग्रो एजन्सी जुना मोंढा माजलगाव येथे जादा दराने कापुस बियाणे विक्री होत आहे.त्यासाठी पंच म्हणुन हाजर राहावयाचे आहे असे सांगुन त्यांचे संमतीने त्यांना सोबत घेऊन महावीर अग्रो एजन्सी,जुना मोंढा, माजलगाव येथे दुपारी २:०० वाजता हजर झालो.महावीर अग्रो एजन्सी, माजलगाव समोर बियाणे खरेदी करून उभे असलेल्या शेतकऱ्यांना विचारले असता, त्यांनी त्यांची नावे श्री.वसंत सिताराम डाके,रा.पिंप्री खुर्द, श्री,गणेश श्रीराम डाके,रा.पिंप्री खुर्द व श्री.श्रीराम सिताराम डाके,रा.पिंप्री खुर्द असे सांगितले.श्री. वसंत सिताराम डाके यांनी सांगितले की,कापूस कबड्डी वाण (कंपनीचे नाव - तुलसी सीडस) ०२ बगेसाठी (प्रति बॅग ११००/- रु.) व राशी आर.सि.एच. ७७९ (कंपनीचे नाव राशी सीडस) च्या ०६ बॅगेसाठी (प्रति बॅग १०५०/- रु.) असे एकूण ८५००/- रुपये महावीर अग्रो एजन्सी या विक्रेत्याने माझ्याकडून घेतले. श्री.गणेश श्रीराम डाके यांनी सांगितले की,दुकानदाराने मला राशी सीड्स कंपनीच्या आर.सि.एच.७७९ वाणाच्या ०६ बेंगेसाठी (प्रति बॅग १०५०/- रु.) असे एकूण ६३००/- रु. माझ्याकडून घेतले. तसेच श्री.श्रीराम सिताराम डाके यांनी सांगितले की,राशी सीडस कंपनीच्या आर.सि.एच.७७९ या कापूस बियाण्याच्या ०७ बॅगेसाठी (प्रति बॅग १०५०/- रु.) असे एकूण ७३५०/- रु. दुकानदारांनी घेतले. भारताचे राजपत्र दि.०८ मार्च २०२४ नुसार कापूस बियाणे बीजी-२ वाणाची किंमत केंद्र शासनाने प्रति बॅग रुपये ८६४/- प्रमाणे निर्धारित करून देण्यात आलेली आहे.शेतकऱ्यांना दिलेल्या बिलांची तपासणी केली असता,कापूस बियाणे प्रति पाकीट ८६०/- रुपये प्रमाणे बिल केल्याचे दिसून आले,परंतु विक्रेत्याने शेतकऱ्याकडून कापूस बियाण्याच्या पाकिटाच्या एम.आर.पी.पेक्षा जास्त पैसे घेतल्याचे आढळून आले. याबाबत शेतकऱ्यांनी लेखी लिहून देऊन विक्रेत्याने फसवणूक केली असल्याचे सांगितले.याबाबत दुकानदारास विचारणा केली असता त्यांनी याबाबत काहीही बोलण्यास नकार दिला.महावीर अग्रो एजन्सी,माजलगाव या दुकानाची तपासणी केली असता त्यांच्याकडे कापूस बियाणे विक्रीचे परवाना नसल्याचे आढळून आले.दुकानासमोर बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी होऊन गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांना रांगेत उभे करून बियाणाची विक्री केली व राहिलेल्या शिल्लक कापूस बियाणे विक्री बंद आदेश दिले. करिता महावीर अग्रो एजन्सी, माजलगाव या कृषी निविष्ठा विक्री केंद्रात उपस्थित असणार ५ शेतक-यांकडून सविस्तर माहिरखून दिलेल्या कमाल कापूस बियाणे विक्री दरापेक्षा जास्तीची रक्कम स्वीकारणारे मोहित मिठुलाल ताते यांनी शेतकऱ्यांकडून शासनाने दिलेल्या कामाला पाकीटाची रकम घेऊन महाराष्ट्र कापूस बियाणे कायदा-२००९ मधील कलम ४(१) , व कलम १० (१), (२) या कलमांचा भंग केला आहे.तसेच कापूस बियाणे किंमत नियंत्रण आदेश-२०१५ चे खंड ५ अन्वये जादा दराने कापूस बियाणे विक्री केल्याने कायद्याचा भंग केला आहे. कापूस बियाणे विक्रीचा परवाना न घेता कापूस बियाणे पाकिटाची विक्री करून महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा नियमन, वितरण,विक्री आणि किमतीचे निश्चितीकरण) कायदा-२००९ (अधिसूचना दि.७ मे २०१०) मधील कलम ४ व ५ चा भंग केला आहे. तसेच शासनाने ठरवून दिलेल्या कमाल विक्री किमतीपेक्षा जास्तीची रक्कम घेऊन शेतकऱ्याऱ्यांची फसवणूक केल्यामुळे भारतीय दंड संहिता-१८६० चे कलम ४२०, ३४ व जीवन आवश्यक वस्तू कायदा-१९५६ चे कलम ३ व ७ चा भंग केला असल्याच्या फिर्यादीवरून, महावीर अग्रो एजन्सी,माजलगाव चे प्रोप्रायटर मोहित मिठुलाल तातेड विरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं २१६/२०२४ कलम ४२०,३४,३,७ अन्वे गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणाचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल संदिप मोरे हे करत आहेत. बियाणे निरीक्षक तथा जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक या पदावर जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, बीड या कार्यालयामध्ये माहे एप्रिल- २०२४ पासून कार्यरत आहे. माझे कार्यक्षेत्र बीड जिल्हा आहे. शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके या कृषि निविष्ठा शेतकऱ्यांना जादा दराने विक्री करू नये, बियाणे काळा बाजार करू नये, भेसळयुक्त बियाणे शेतकऱ्यांना विकू नये तसेच रास्त दरात व गुणवत्ता पूर्ण निविष्ठा शेतकऱ्यांना उपलब्ध व्हावे, याकरिता बियाणे निरीक्षक म्हणून माझी नेमणूक केली आहे.

-----------------

### सत्तेसाठी इंडिया आघाडीच्या

असल्याचे काँग्रेसमधील सूत्रांनी सांगितले. इंडिया आघाडीच्या शनिवारी होणाऱ्या बैठकीत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, काँग्रेस नेते राहुल गांधी, सरचिटणीस वेणुगोपाल यांच्यासह शरद पवार, अखिलेश यादव, तेजस्वी यादव, महबूबा मुफ्ती, फारुख अब्दुल्ला, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन, झारखंडचे मुख्यमंत्री चंपई सोरेन, कल्पना सोरेन आणि आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल आदी नेते सहभागी होणार आहेत.

---------

### अबब! नागपूरात तापमान

हवामान केंद्रामध्ये ४४ अंश सेल्सिअस तापमान होते. मग नागपुरात खरे तापमान किती? यावरून चर्चेला उधाण आले आहे.

**स्वयंचलित हवामान यंत्र सदोष...**

दोन दिवसांपूर्वी दिल्लीत विक्रमी ५२.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी केंद्रावर देखील सर्वाधिक तापमान नोंद होत असल्याने ही गोष्ट चर्चेत आहे. याबाबत प्रादेशिक हवामान केंद्राच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, तीव्र उष्णतेच्या दिवसात स्वयंचलित हवामान यंत्राचा डेटा संदर्भासाठी वापरला जाऊ नये, कारण त्याचे सेन्सर्स ३८ अंश सेल्सिअसच्या पुढे निकामी होण्याची शक्यता असते. स्वयंचलित हवामान यंत्र सेन्सर सदोष आहेत. यामुळे ठराविक तापमानानंतर या नोंदी अविश्वसनीय ठरतात. सरासरी ३८ ते ४० अंशांपेक्षा कमी तापमानासाठी ते चांगले काम करतात. आवश्यक घटकांचा विस्तार एकरेषीय असणे आवश्यक आहे. परंतु उच्च तापमानात ही प्रक्रिया तिची रेखीयता गमावते,'' असे आरएमसीमधील वरिष्ठ हवामान अंदाज शास्त्रज्ञानी स्पष्ट केले.

-------------

### शेवटच्या टप्प्यातल्या ५७

(८), उडिसा (६), हिमाचल प्रदेश (४), झारखंड (३), चंडीगडमधील एका जागेवर मतदान होणार आहे. त्यानंतर ४ जून रोजी निवडणूक निकाल लागणार आहे. शेवटच्या टप्प्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतच ३ केंद्रीय मंत्र्यांचे नशीब ईव्हीएम मशीनमध्ये बंद होणार आहे. मोदी हे वाराणसी मतदारसंघातून तर केंद्रीय मंत्री डॉ. महेंद्र नाथ पांडेय चंदौली येथून तर, अनुप्रिया पटेल मिर्झापूरमधून आणि राज्यमंत्री पंकज चौधरी महाराजगंज मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत.


-------

### मी झुकणार नाही, उद्या पुन्हा

त्यानंतर लोकसभा निवडणूकीच्या सातव्या टप्प्यासाठी उद्या १ तारखेला मतदान होणार आहे. त्यानंतर लगेच २ जून रोजी अरविंद केजरीवाल यांना तिहारच्या तुरुंगात शरण जावे लागणार आहे. मात्र काही दिवसांपासून अरविंद केजरीवाल जामीनाचा कालावधी वाढवून मिळावा यासाठ प्रयत्न करत होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाने याप्रश्नी स्पष्ट निकाल न दिल्याने अखेर अरविंद केजरीवाल यांनी पुन्हा तुरुंगात शरण जाण्याचा निर्णय घेतला आहे. यापार्श्वभूमीवर अरविंद केजरीवाल यांनी शुक्रवारी एक व्हिडिओ जारी केला. यातून भाजपावर निशाणा साधताना अरविंद केजरीवाल म्हणाले, त्यांनी मला अनेक प्रकारे तोडण्याचा प्रयत्न केला, मला गप्प करण्याचा प्रयत्न केला, पण ते यशस्वी झाले नाहीत. मी तुरुंगात असताना त्यांनी माझा अनेक प्रकारे छळ केला. त्यांनी माझी औषधे बंद केली. या लोकांना काय हवे होते ते माहित नाही त्यांनी असे का केले? असा सवालही यावेळी त्यांनी उपस्थित केला. पुढे बोलताना अरविंद केजरीवाल म्हणाले की, जेव्हा मी तुरुंगात गेलो होतो तेव्हा माझे वजन ७० किलो होते. आज ते ६४ किलो आहे. तुरुंगातून सुटल्यानंतरही माझे वजन वाढत नाही. हे शरीरातील एखाद्या गंभीर आजाराचे लक्षणही असू शकते, असे डॉक्टर सांगत आहेत. त्यासाठी अनेक चाचण्या कराव्या लागतील, असेही यावेळी त्यांनी सांगितले.

-----------

cmyk



बीड : राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना शिवसेनेचे जिल्हा संघटक नितीन भैया धांडे बुलंद छावा जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहीर, नारायण गवते, आजिनाथ आदमाने, राष्ट्रीय छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष युवराज मस्के,मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके, गणेश नाईकवाडे, भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष गणेश धोंडरे, संभाजी सेनेचे जिल्हाध्यक्ष भरत वालेकर, अशोक सुखवसे, एड. संतोष घोलप, प्रा. उगले आर आर,जीवन धांडे, विजय पवार, गोरख नागरगोजे, दादासाहेब गवते,मोहन गवते आदी.



# सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये डॉ.राजेश इंगोले यांचा समावेश

## ९१ गायकांनी सलग गायली गीतकार जगदीश खेबुडकर यांची ९१ गाणी; कोल्हापुरात विश्वविक्रमी संगीत सोहळ्याचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध गीतकार कै.जगदीश खेबुडकर यांच्या ९१ व्या जयंतीनिमित्त कोल्हापूर डॉक्टर्स असोसिएशनच्या सरगम म्युसिकल ग्रुप तर्फे खेबुडकर यांची सलग ९१ गाणी गावून त्यांना सांगीतिक आदरांजली अर्पण करण्यात आली. या विश्वविक्रमी सोहळ्यास संपूर्ण महाराष्ट्रातून नामांकित गायक, गायिकांनी, सिनेगायकांनी आपली हजेरी लावली. त्यामुळे या कार्यक्रमाची रंगत वाढवली. या सोहळ्यात अंबाजोगाईचे भूमिपुत्र तथा इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक विभागाचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी दोन गाणी गात आपले नांव सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये सुवर्णाक्षरात कोरले. आणि अंबाजोगाईचा नांवलौकिक सर्वदूर केला.

कोल्हापूर येथील मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अशा इंद्रप्रस्थ म्युसिकल ऑडिटोरिएम मध्ये हा देखणा विश्वविक्रमी सोहळा हजारो जगदीश खेबुडकर प्रेमींच्या साक्षीने संपन्न झाला. सलग ९१ गाणी गाण्याचा हा संगीत सोहळा सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू होता. इतका प्रदीर्घ काळ चाललेला हा सोहळा एक प्रकारचा जागतिक पातळीवर विक्रम ठरला. याची नोंद सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये अधिकृतपणे घेण्यात आली. या सोहळ्यात अंबाजोगाईचे भूमिपुत्र तथा इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक विभागाचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी दोन गाणी गात अंबाजोगाईचे नांव सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये सुवर्णाक्षरात कोरले. डॉ.इंगोले यांनी वैयक्तिक गटात विठू माऊली तू माऊली जगाची तर ड्युएट प्रकारात सुप्रसिद्ध सिने पार्श्वगायिका नीलिमा शेटे यांच्या साथीत चंद्र आहे साक्षीला हे गाणे गात उपस्थित रसिक प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळविली. या विश्वविक्रमी संगीत सोहळ्याचे उदघाटन सोसायटी ऑफ इंटेगरेटेड फेडरेशन ऑफ अवॉर्डचे एडिटर इन चीफ डॉ.दिपक राऊत यांच्या हस्ते व दैनिक पुढारीचे उपसंपादक पी.ए.पाटील, कोल्हापूर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.गिता पिलाई, डॉ.आशा




जाधव, आय.एम.एचे महाराष्ट्राचे सहसचिव डॉ.राजेश इंगोले, सरगम ग्रुपच्या डॉ.आशा शितोळे, डॉ.सुभाष भाट यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ.दिपक राऊत यांनी महाराष्ट्रात प्रथमच अशा प्रकारच्या कार्यक्रमाची जागतिक पातळीवर नोंद घेतली असल्याचे सांगत हा विश्वविक्रमी संगीत सोहळा आजपर्यंत मी पाहिलेल्या सर्व जागतिक विक्रमांमध्ये आगळा-वेगळा एकमेवाद्वितीय ठरला असल्याचे मत व्यक्त केले. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातून इतके नामांकित गायक एकाच वेळी एका संगीत मंचावर एकत्र येऊन सलग ९१ गाणी नॉनस्टॉप गातात हा विश्वविक्रमी रेकॉर्ड नजीकच्या काळात मोडेल असे वाटत नाही असे मत त्यांनी यावेळी मांडले. या विश्वविक्रमी सांगीतिक आदरांजली सोहळ्यास कै.जगदीश खेबुडकर नाना यांना श्रद्धांजली अर्पण करण्यास कोल्हापूरकरांनी मोठी गर्दी केली होती. या रसिक-श्रोत्यांनी दिवसभर कार्यक्रम स्थळी थांबत सर्व गायकांना भरभरून प्रतिसाद दिला. तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कोल्हापूर डॉक्टर्स असोसिएशनच्या सरगम म्युसिकल ग्रुपच्या डॉ.आशा शितोळे, डॉ.सुभाष भाट, डॉ.राजेंद्र तामगावकर, डॉ.दिगंबर सूर्यवंशी, अमेय दिवाण, प्रेषित ,शैलेश, डॉ.अनिल कवठेकर, संदीप शेंद्रे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

### हा अंबाजोगाईच्या मातीचा सन्मान...!

मला मिळालेला सन्मान हा तमाम अंबाजोगाईकरांनी आजवर भरभरून दिलेल्या प्रेमाचा आणि विश्वासाचा आहे. सांगीतिक क्षेत्रात मला ही संधी मिळेल असे कधीही वाटले नव्हते. हे सर्व स्वप्नवत वाटत आहे. या शिखरावर येण्यासाठी माझे गुरू तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, अशोक खंदारे, श्रीरंगराव सुरवसे, स्वररत्न राजकुमार ठोके, सुभाष शेप, मयुरी मजगे, आसाराम जोशी, लक्ष्मण जोगदंड, बळीराम उफाडे, अकबर पठाण, राज माने, प्रा महादेव माने, कै.काळेगावकर काका या सर्व मार्गदर्शक मित्रांचा, इंडीयन मेडिकल असोसिएशनच्या सर्व सहकारी डॉक्टर्सचा मोलाचा वाटा आहे.

– डॉ.राजेश इंगोले
(सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा अध्यक्ष,
इंडियन मेडिकल असोसिएशन सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र राज्य.)

# माजलगाव शहरात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती निमित्त महिलांकडून अभिवादन

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरात राष्ट्रमाता पुण्यशलोक आहील्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पावनसृमितीस महीलांच्या हस्ते दि ३१ मे शुक्रवार रोजी सकाळी १०:०० वाजता अभिवादन करण्यात आले.



या वेळी शिवसेना तालुका प्रमुख तुकाराम येवले,बबनराव सरवदे,माजी नगराध्यक्ष डॉ. आशोकराव तिडके, डॉ.वाघमोडे,माजी सभापती कल्याण आबुज,भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर (माऊली) सरवदे, आशोक डोणे,प्रा प्रकाश गवते, व्यापारी संघटनेचे उपाध्यक्ष नारायणराव सातपुते, सामाजिक कार्यकर्ते राजेश घोडे, वंचित आघाडीचे नेते धम्मानंद साळवे, विलास नेमाणे, लक्ष्मीकांत सोन्नर,बाळासाहेब सोनसळे,रासपाचे मराठवाडा अध्यक्ष कल्याणराव गवते, भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे बीड जिल्हा सरचिटणीस अविनाश कांडुरे,रासपाचे तालुकाध्यक्ष मुक्तीराम आबुज, भागवतराव गायकवाड, अण्णासाहे वगरे, आशोकराव आबुज,डोणे सर, सोनपसारे सर, रोहीत वगरे,विजय धायगुडे,आशोक देवकते,प्रथमेश बरकडे,शंकराव आबुज,कुकडे सर, आजिंक्य गायके, पेंटर पंकजकुमार साळवे,पवनराजे देशमुख सर,प्रल्हाद धरपडे,तात्या पांचाळ,हनुमान सरवदे,मुजांबा सरवदे,आविनाश कांबळे व सर्व समाज बांधव यांची उपस्थिती होती.

# चक्रधर माध्यमिक विद्यालयाचा ९३ टक्के निकाल

**बीड । प्रतिनिधी**

श्री. चक्रधर शिक्षण व समाज प्रबोधन मंडळ, बीड संचलित . श्री. चक्रधर माध्यमिक विद्यालय कॅनल रोड बीड या विद्यालयाचा सन २०२३- २४ चा इयत्ता दहावीचा निकाल ९३ % टक्के लागला असून विद्यालयातून एकूण २८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते पैकी २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा मान कुमारी नाटकर पुष्पा हिने पटकावला असून तिने ९३.४० % तर विद्यालयातून कुमारी वैष्णवी कदम हीने ९१.४०% टक्के घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला आहे. विद्यालयाचा विद्यार्थी चिरंजीव पवार अनिकेत यांनी ८९ % टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळवला आहे.शुभम राजपुरे यांनी ८५.८०% गुण घेऊन चतुर्थ क्रमांक पटकावला आहे.१) पृथ्वीराज नागरगोजे यांनी ८५.२०% २) ढवळे प्रतीक ८३.२० ३) गिरी संकेत ८२.८० ४) सावंत लहू ८२.४० ५) छडेदार गणेश ८०.२० ६) शेंडगे तेजस्विनी ७९.८० ७) शिंदे साक्षी ७८.६० ८) जाधव सागर ७६.६० ९) आडे विशाल ७४% १०) शेख मेहरीन ७४% ११) मोहिते र ऋशल ७२.८०% १२) पवार काजल ७१.४०% १३) निर्मळ पूजा ७१% १४) निर्मळ नंदिनी ७०% १५) शेळके प्रेम ६९.२० १६) बरबडे रोहन ६८.२०% १७) जाधव श्रुती ६७.८०% १८) चाळक निखिल ६५.४०% १९) शेख जिया ६४.६०% २०) कानडे समृद्धी ४४.४०% २१) आव्हाड आदर्श ४१.८०% चक्रधर विद्यालयाचे एकूण २८ विद्यार्थी मार्च २४ परीक्षे स बसले होते पैकी २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यामध्ये एकूण १८ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले असून ५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत तर ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष सन्माननीय मोहनराव शिरसाट साहेब व सचिव विवेक भैय्या शिरसाठ आणि विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी करून त्यांना पुढील शैक्षणिक कामगिरी साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# माजलगावात राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी

## » राष्ट्रमाता लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे महिलांच्या हस्ते पूजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकमाता राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती माजलगाव शहरांमध्ये विविध ठिकाणी पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करून राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमा पूजन करून उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी माजलगाव धरणाच्या कमानी जवळ राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर चौकामध्ये दिनांक ३१ मे रोजी सकाळी आकरा वाजता पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करून राष्ट्रमाता लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे महीला च्या हस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, मा.जि.प.सभापती कल्याणराव आबुज मा.जि.प.सदस्य बबनराव सरवदे, डॉ.अशोकराव तिडके डॉ.भारतराव वाघमोडे, अण्णासाहेब वगरे, ज्ञानेश्वर सरवदे,आशोक डोणे, प्रा. प्रकाश गवते सर ,नारायण सातपुते, राजेश घोडे, धम्मानंद साळवे, किसनराव हराळ, लक्ष्मीकांत सोन्नर सर, बाळासाहेब सोनसळे सर, कल्याण गवते, अविनाश कांडुरे, मुक्तीराम आबुज, भागवत गायकवाड, आशोकराव आबुज ,डोणे सर, सोनपसारे सर, विलास नेमाणे, रोहीत वगरे, विजय धायगुडे, आशोकराव देवकते, प्रथेमेश बरकडे, शंकराव आबुज, ज्ञानोबा कुकडे सर, आजिंक्य गायके, पेंटर पंकजकुमार साळवे, पवनराव देशमुख सर, प्रल्हाद धरपडे, तात्या पांचाळ, हनुमान सरवदे, मुजांबा सरवदे, आविनाश कांबळे, सौ .अन्नपूर्णा संपतराव हराळ, सौ .कौशल्या किसनराव हराळ ,सौ .आशाबाई अशोकराव देवकते,सौ .प्रतिभा लक्ष्मीकांत सोन्नर ,सौ संजीवनी पंडितराव खोडवे,सौ रंजना आदिनाथ कुंडकर, सौ .डॉ .स्वाती भारतराव वाघमोडे,सौ .गीता ज्ञानेश्वर गायके ,सौ .सुनंदा श्रावण कुंडकर ,सौ.सूनिता भागवतराव



गायकवाड,सौ . मीराताई नारायणराव भले ,सौ . निलावती कानिफनाथ व्हरकटे ,सौ .अश्विनी विलास बनसोडे,सौ ज्योती विलास नेमाने,कु .डॉ वैष्णवी आदिनाथ कुंडकर ,कु अहिल्या राजे विलास नेमाने, महीला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.


पान ६ वरून...


### अहिल्याबाई होळकर या एक कुशल

महत्त्वपूर्ण कार्य राजमाता अहिल्याबाई यांनी केले. म्हणूनच अहिल्याबाई हे मराठेशाहीत उमगलेले एक दिव्य फुल आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही अशी भावना देखील राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. २९ वर्ष राज्यकारभार नेटाने चालवणाऱ्या एक महान महाराणी म्हणून अहिल्यादेवी होळकर लौकिक पावल्या आहेत. आपला राज्यकारभार हाकताना त्याची कुशल प्रशासन चालविण्याची हातोटी व पराक्रम उजळून निघाले. त्यामुळेच राजमाता अहिल्याबाई होळकर या एक उत्तम प्रशासकच नव्हे तर तर एक पराक्रमी योध्या असल्याचे दिसून आल्याचे मोदी यांनी सांगितले. सर्व प्राणी मात्रांना संजीवनरुपी अमरप्रेम आणि जीवन देणाऱ्या अहिल्यादेवी होळकर मल्हाररावांचे स्वप्न पूर्णत्वास नेणाऱ्या एक महान पराक्रमी सुनबाई ठरल्या असल्याची दरपोक्ती याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. आपल्या २९ वर्षाच्या राज्यकारभारात अनेक युद्धांमध्ये साहसी योध्याप्रमाणे विचारपूर्वक निर्णय घेत त्यांनी युद्धाचे नेतृत्व करून विजय हस्तगत केला होता. आपल्या प्रांताच्या रक्षणार्थ व अन्याया विरुद्ध आक्रमण करण्यास कधीही हयगय करत नसत. म्हणूनच महाराणी अहिल्याबाईंची ओळख मावळ प्रांताच्या राजमाता म्हणून होती. त्यांच्यातील अद्भुत साहसाला आणि अदम्य प्रतिभेला पाहून

मोठ-मोठे राजे आणि प्रभावशाली शासक सतत महिला सशक्तीकरणाच्या बाजूने होत स्त्रियांची परिस्थिती बदलण्या करता त्यांनी प्रयत्न केले.

विधवा स्त्रियांना त्यांचा अधिकार मिळण्याकरता अहिल्याबाईंनी कायदा घडविला. विधवा महिलांना त्यांच्या पती- संपत्तीत अधिकार मिळवून दिले व मुल दत्तक घेण्याचा हक्क देखील प्राप्त करून अहिल्याबाईंचे हृदय दया, क्षमा, नि परोपकार या भावनांनी ओतप्रोत भरलेले दिसून येते म्हणूनच त्यांना करुणेची देवी, कुशल समाजसेविका या प्रतिमेने त्यांना ओळखलं जातं. आपल्या स्वतःच्या आयुष्यात दुःखाचा डोगर कोसळल्या नंतरही अहिल्यादेवींनी धीर डगमगु न देता राजकारभार सांभाळला. वैयत्तिक दुःखाचा प्रभाव त्यांनी प्रजेवर पडू दिला नाही.अशा या थोर कुशल प्रशासक, योध्या, व धनुर्धर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. राजमाता अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन करतांना गणेश मसने, दत्ता सरवदे, महेश कदम, जावेद गवळी, गोविंद पोतंगले, नवनाथ चौरे, प्रशांत हेडे,आकाश कऱ्हाड, शरद काळे, सय्यद ताहेर, राजाभाऊ उकरे, कृष्णा हेडे, कृष्णा मडके, गोटू थाटकर, गोरोबा थाटकर, ओंकार गायके, सिद्धू वैद्य, संतोष गायके, ईश्वर डोने हे सहभागी झाले होते.

### जिल्हाधिकाऱ्याला पाणी

माहे मार्च-२०२३ पासून बीड जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठ्याचा उपसा रोखण्यासाठी प्रत्येक तहसिल निहाय पथके निर्माण करुन पाणी उपस्यावर प्रतिबंध घातलेला आहे. तसेच या कार्यालयाकडून दि. १४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये जिल्ह्यातील सर्व धरणांमधील पाणी साठा केवळ पिण्यासाठी आरक्षीत केलेला असल्याने अपुरे पर्जन्यमानानंतरही आजपर्यंत सदर पाणीसाठी टंचाई परिस्थितीत उपयोगात आलेला आहे. तसेच बीड जिल्ह्यामध्ये आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाणी टंचाईमध्ये टँकर मंजूरीचे अधिकार सर्व उपविभागीय अधिकारी यांना व विहिर बोअर अधिग्रहणाचे अधिकार सर्व तहसिलदार यांना प्रदान करण्यात आलेले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. सर्व बांधकामे वेळेवर पूर्ण करणे महत्वाचे आहे. आणि वेळेवर पूर्ण करणे अपेक्षीत आहे. बांधकाम थांबविल्यास त्याची किंमत वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही असे जिल्हाधिकारी बीड यांनी कळविले आहे.

### मतमोजणी प्रक्रियेची

मतमोजणीच्या वेळी आणि मतमोजणीनंतर सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी संयम बाळगावा कोणाचा अपमान होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी यावेळी केले. याचवेळी त्यांनी सर्व शहरांमध्ये तसेच जिल्हा भरात पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून सोशल मीडियावरही पोलिसांचे बारकाईने लक्ष राहणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना आयकरात सुट मिळावी याबाबत विचार करू-नितीन गडकरी

**नागपूर । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीत भारतीय जनता पार्टीला स्पष्ट बहूमत मिळणार असून सरकार स्थापन झाल्यानंतर राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केंद्र सरकारकडे केलेली वृत्तपत्र खरेदी करणार्यांना वार्षिक पाच हजार रूपयाची उत्पन्न करात सुट द्यावी ही मागणी आपण संसदेच्या सभागृहात मांडू आणि सकारात्मक निर्णय होईल अशी ग्वाही नागपूर लोकसभा मतदार संघातील भाजपचे उमेदवार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाला दिली.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांना वृत्तपत्र आणि पत्रकारांच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. नागपूर पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदिप शेंडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवून पत्रकार संघाचे निवेदन आणि माहितीपुस्तिका देवून चर्चा केली. यावेळी नितीन गडकरी म्हणाले, ग्रामीण भागातील पत्रकारांचे प्रश्न, वर्तमानपत्रांच्या समस्या आपल्याला माहित आहेत. भारतीय जनता पार्टीचे सरकार स्थापन होणार आहे. त्यानंतर संसदेच्या सभागृहात वृत्तपत्रांच्या मागणीसंदर्भात आपण पुढाकार घेवू राज्य पत्रकार संघाने वृत्तपत्र खरेदी करणार्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजाराची सुट द्यावी ही मागणी वृत्तपत्र व्यवसायाला बुस्टर डोस ठरणार आहे. प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्टमंडळाने नागपूर विभागातील विविध पक्षाच्या उमेदवारांना निवेदन देवून पत्रकारांच्या प्रश्नाकडे प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांचे लक्ष वेधले आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप शेंडे यांच्यासह सरचिटणीस अंकुश डाखोरे, संघटक मोहम्मद इलियास व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# महात्मा फुले चौकात राजमाता अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरा पासुन जवळच आसलेल्या फुलेपिंपळगाव फाट्यावर महात्मा फुले चौक येथे ज्याच्या मनगटात बळ,बुद्धी,चातुर्य आहे तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनु शकतो हे विचार सांगणा-या राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त दि ३१ मे शुक्रवार रोजी सकाळी ८:०० वाजता अभिवादन करण्यात आले.



यावेळी भगवान सरवदे,ब्रम्हगावचे सरपंच नारायण भले,रासपचे ता अध्यक्ष मुक्तीराम आबुज,माजी सरपंच दशरथ उंबरे,एकता परिषदेचे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे,सेवा सहकारी सोसायटी चे संचालक डी एस साळवे दादा,प्रा संजय बागुल सर, सदधम्म सेवासंघाचे ट्रष्टी सोपान उजगरे,भारतीय बौद्ध महासभेचे डॉ भागवत साळवे,,ईंगवले सर ,विरभद्र स्वमी सर, इंजीनियर भागवत वनवे साहेब,नाईकवाडे आण्णा,यां मान्यवरांच्या उपस्थितीत राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमासाठी मान्यवरां बरोबरच गावातील प्रतिष्टीत नागरीक,युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजाभाऊ वजीर,बाळु उगले, नामदेव चिंचाने,आसाराम गिरगुणे,आनंद किरवले,बुद्धभुषण साळवे,सचिन ससाने,बाबा गिरगुणे, ज्ञानेश्वर गिरगुणे,कैलास गिरगुणे,गोविंद गिरगुणे,राजेभाऊ गायकवाड, गोविंद काळे, नवनाथ खामकर,परसुराम खामकर,बाळु गिरगुणे,अनिल खामकर, राहुल खामकर,ऋषीनाथ खामकर,उद्धव खामकर,महादेव गिरगुणे,राजाभाऊ खामकर, गोविंद खामकर, विशाल खामकर सह गावातील युवकांनी परिश्रम घेतले.

cmyk

# भीषण पाणीटंचाई; शेतकऱ्यानं आपल्या शेतातच बसवला कॅमेरा, पाणी चोरी करणाऱ्यावर नजर

सध्या राज्यात तापमानाचा पारा वाढलाय. बहुतांश जिल्ह्यातील तापमान हे ४० अंशाच्या पुढे गेलं आहे. अनेक ठिकाणी पाण्याची समस्या निर्माण होतेय.शेतकऱ्यांना () गावोगावच्या ग्रामस्थांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतोय. दरम्यान, या जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरमधील एका शेतकऱ्याने अनोखी शक्कल लढवली आहे. आपल्या शेतातील पाण्याची चोरी होऊ नये म्हणून शेतकऱ्याने शेतात चक्क कॅमेरा बसवला आहे. रामेश्वर गव्हाणे असं सिल्लोड तालुक्यातील बोदवड गावातील शेतकऱ्याचं नाव आहे.

महाराष्ट्रात पाण्याचे संकट गडद

महाराष्ट्रात पाण्याचे संकट गडद झाले आहे. पाण्याची चोरी थांबवण्यासाठी एका शेतकऱ्याने आपल्या शेतात सीसीटीव्ही कॅमेरा बसवला आहे. मराठवाड्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील अनेक भागातील जनता दीर्घकाळापासून दुष्काळाचा सामना करत आहे. धरण आणि तलावात पाणी नाही, त्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. पाण्याची चोरी रोखण्यासाठी शेतकऱ्यांना आपल्या शेतात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे लागत आहेत.

पाण्याची चोरी आणि वन्य प्राण्यांकडून मिरचीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी बसवला कॅमेरा



पाणी हे किती महत्त्वाचे हे रामेश्वर गव्हाणे या शेतकऱ्यानं दाखवून दिलं आहे. रामेश्वर यांनी शेतातील पाण्याची चोरी टाळण्यासाठी आणि वन्य प्राण्यांकडून मिरचीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी आपल्या शेतात ३६० अंशाचा कॅमेरा बसवला आहे. मराठवाड्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यानं ही परिस्थिती निर्माण झालीय. महाराष्ट्रातील अनेक भागातील जनता दीर्घकाळापासून दुष्काळाचा सामना करत आहे. धरण व तलावात पाणी नाही, त्यामुळं शेतकऱ्यांवर मोठे संकट उभे ठाकले आहे. यंदा पाण्याची मोठी समस्या आहे. यंदा पाऊस कमी झाला आहे, यावेळी दुष्काळी परिस्थिती अत्यंत भीषण आहे, आजपर्यंत पाण्याची चोरी झाली नाही, पण पुढे काय होईल हे सांगता येत नसल्याचे रामेश्वर गव्हाणे म्हणाले. या कॅमेऱ्याचा फायदा असा आहे की, दीड एकर मिरचीच्या शेतात कोणीही पीक चोरु शकत नाही आणि या कॅमेऱ्याच्या मदतीने शेताचे नुकसान करणाऱ्या वन्य प्राण्यांचाही शोध घेता येतो. या सीसीटीव्हीच्या स्क्रिनशॉटद्वारेही नोटिफिकेशन येत असल्याचे माहिती रामेश्वर यांनी दिली.

पाणीपुरवठा करणारे तलाव नदी नाले धरणे कोरडी : महाराष्ट्रात सध्या जलसंकट गडद होताना दिसत आहे. त्यामुळं शेतीसह पण्याच्या पाण्याचा देखील प्रश्न निर्माण झालाय. गतवर्षी पावसाळ्यात उशीर झाल्याने पिकांच्या पेरणीला बराच विलंब झाला होता. अनेक शेतकऱ्यांना पुन्हा पेरणी करावी लागली. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये जनावरांना पिण्यासाठीही पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. त्यानंतर राज्य सरकारने बैठक घेऊन अनेक जिल्हे दुष्काळग्रस्त घोषित केले. महाराष्ट्रातील लातूर हे दुष्काळ आणि पाणीटंचाईसाठी ओळखले जाते, जिथे एकेकाळी रेल्वेने पिण्याचे पाणी पोहोचवले जात असे. सोलापूरला पाणीपुरवठा करणाऱ्या उजनी धरणाची पाणीपातळी यंदा मायनसवर पोहोचली आहे. त्यामुळ नागरिक चिंतेत आहेत.

पाणीटंचाईचा सर्वाधिक फटका शेतीला

पाणीटंचाईचा सर्वाधिक फटका हा शेतीला बसणार आहे. शेतीसाठी भूजलाचा सर्वाधिक वापर केला जातो. काही कृषी संस्थांच्या मते, भारतातील ९० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते. केंद्रीय जल आयोगानुसार २००० मध्ये वापरण्यात आलेल्या एकूण पाण्यापैकी ८५.३ टक्के पाणी शेतीसाठी वापरले गेले. त्यामुळे आता अनेक राज्ये कमी पाणी वापरणाऱ्या अशा पिकांवर आणि वाणांवर लक्ष केंद्रित करत आहेत.

## काकडी लागवडीतील समस्या आणि उपाययोजना




काकडी हे भारतीय पिक असल्यामुळे संपूर्ण भारतात काकडीची लागवड केली जाते. काकडी कोकणासारख्या अति पाऊस प्रदेशात देखील पावसाळी हंगामात काकडीचे भरपूर उत्पादन घेता येते. उन्हाळ्यात काकडीला खुप मागणी असते. काकडक पित्ताला कमी करते. काकडी स्वादिष्ट व उष्णतेचा त्रास खुप कमी करते व तहान शमवते जेवणात बरेच लोक याचा उपयोग करतात काकडी लागवडीसाठी जमिन : काकडी हे उष्ण व कोरडया हवामानात येणारे पीक आहे. पाण्याचा निचरा होणारी मध्यम ते भारी जमीन या पिकास योग्य आहे.

लागवडीचा हंगाम : काकडीची लागवड खरीप व उन्हाळी हंगामात होते. खरीप हंगामात काकडीची लागवड जून ते जूलै महिन्यात व उन्हाळी हंगामामध्ये साधरणतः जानेवारी महिन्यात करतात. जमिनीत योग्य प्रमाणात शेणखत मिसळून काकडी लागवड करतात. पूर्वमशागत व लागवड : १. उभी आणि आडवी ढेकळे फोडून नांगरणी करावी. २. चांगले कुजलेले ३० ४० गाड्या शेणखत मातीत मिसळावेत. ३. त्यानंतर एक वखरणी करावी. ४. उन्हाळी हंगामात ६० ७५ सेंटिमीटर अंतरावर सऱ्या पडून घ्याव्यात. खते व पाणी व्यवस्थापन : १. लागवडीपूर्वी काकडी पिकास ''५० किलो नत्र, ५० किलो पालाश , ५० किलो स्फुरद द्यावे. २. लागवडीनंतर १ महिन्याने नत्राचा दुसरा हफ्ता ५० किलोचाचा द्यावा. ३. पावसाळ्यात ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. ४. उन्हाळ्यात ४ ते ५ दिवसांच्या अतंराने पाणी द्यावे. आंतरमशागत : १. महाराष्ट्रात काकडीचे पीक जमिनीवर घेतले जाते. त्यामुळे लागवडींनतर ३० दिवसांनी पिकातील गवत काढून टाकावेत. २. फळे मातीला लागून खराब होवू नये म्हणून खाली काटक्या टाकाव्यात. काकडीच्या जाती : शीतल वाण ही जात डोंगर उताराच्या हलक्या किंवा जास्त पावसाच्या प्रदेशात चांगली वाढते. पुना खिरा या जातीमध्ये हिरवे आणि पिवळट तांबडी फळे येणारे २ प्रकारचे बियाणे बाजारामध्ये मिळते. प्रिया ही संकरीत जात असून फळे रंगाने गर्द हिरवी आणि सरळ असतात. पुसा संयोग ही लवकर येणारी जात असून त्याची फळे हिरव्या रंगाची असतात.

## रताळ्याच्या शेतीतून करू शकता लाखोंची कमाई!

भारतीय शेतकरी आता पारंपरिक शेती सोडून वेगवेगळ्या पिकांच्या लागवडीवर भर देत आहेत, आणि त्यात यशस्वीही होत आहेत. शेतकरी रताळ्यांसह अनेक प्रकारची फळे आणि भाज्यांची लागवड करतात. असेच एक वेगळे पीक म्हणजे रताळे. दिसायला आणि चवीला बटाट्यासारखे असले तरी त्यात बटाट्यापेक्षा जास्त गोडवा आणि स्टार्च आहे. याशिवाय रताळ्यामध्ये जीवनसत्त्वेही चांगल्या प्रमाणात आढळतात. याचे सेवन आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते, यामुळे चेहऱ्यावर चमक येते आणि केसांची वाढ होते. वाढत्या मागणीमुळे रताळे लागवडीमुळे शेतकऱ्यांना चांगला नफा मिळू शकतो.



रताळे लागवडीचा हंगाम : रताळे हे सदाहरित पीक आहे, ज्याचे उत्पादन शेतकऱ्यांना वर्षभर मिळू शकते. पण चांगल्या उत्पादनासाठी उन्हाळी आणि खरीप हंगामात या पिकाची लागवड केली जाते. शेतकरी जून ते ऑगस्ट दरम्यान रोपे लावतात. खरीप हंगामातील पिकांसह रताळ्याचे पीक तयार होते. डिसेंबर-जानेवारी महिन्यात धानाची दुसरी कापणी झाल्यानंतर शेतकरी रताळ्याची पेरणी करतात.

रताळ्याच्या सुधारित जाती : रताळ्याच्या ४०० हून अधिक जाती असल्या तरी देशातील बहुतांश शेतकऱ्यांनी लागवड केलेल्या जातींमध्ये पुसा गोल्डन, पुसा व्हाईट, कोकण अश्विनी, राजेंद्र गोड बटाटा-५, काळमेघ, श्री रत्न क्रॉस-४, श्रीभद्र या जातींचा समावेश आहे. श्री अरुण, श्री वरुण, श्रीवर्धिनी, श्री नंदिनी आणि वर्षा यांचा सुद्धा सुधारित जातीत समावेश आहे. रताळ्याच्या या सुधारित जाती ११० ते १२० दिवसात तयार होतात.

लागवडीसाठी हवामान आणि माती : रताळ्याच्या लागवडीसाठी चिकणमाती किंवा चिकण मातीयुक्त जमीन सर्वोत्तम मानली जाते, जी सेंद्रिय घटकांनी समृद्ध आहे. लागवडीसाठी, मातीचा पीएच ५.८ ते ६.७ च्या दरम्यान असावा. रताळ्याच्या लागवडीसाठी सौम्य आणि समशीतोष्ण हवामान सर्वात योग्य आहे. लागवडीसाठी सर्वात योग्य तापमान २१ ते २७ अंश सेल्सिअस आणि पर्जन्यमान ७५ ते १५० सेंटीमीटर असावे.

रताळ्याची लागवड पद्धती : रताळ्याची लागवड करण्यासाठी प्रथम शेत नांगरून घ्यावे. शेत काही दिवस उघडे ठेवा म्हणजे जमिनीतील कीटक, पिकांचे जुने अवशेष आणि तण नष्ट होतील. हेक्टरी १८० ते २०० क्विंटल कुजलेले शेणखत शेतात टाकावे. यानंतर रोटाव्हेटरच्या सहाय्याने शेताची २ ते ३ वेळा नांगरणी करून माती भुसभुशीत करावी. शेत तयार झाल्यानंतर, रताळे पेरा. रोपवाटिकेत तयार केलेल्या रोपांद्वारे सुद्धा लागवड करता येते. त्याची रोपे एक महिना अगोदर तयार केली जातात, रोपवाटिकेत बिया पेरून रोपे तयार केली जातात. ही रोपे उपटून शेतात लावले जातात. रताळ्याची रोपे शेताच्या कड्यांवर लावली असल्यास, इतर वनस्पतींपासून या रोपांचे अंतर सुमारे एक फूट असावे. रताळ्याच्या रोपांची २० सेमी खोलीवर पेरणी करावी. रोपे लावल्यानंतर ते सर्व बाजूंनी मातीने झाकावे. रोपे सपाट जमिनीवर लावावे, दोन ओळीतील अंतर सुमारे २ फूट ठेवावे.

रताळ्याच्या शेतीतून नफा : रताळ्याच्या सुधारित वाणांची निवड आणि सुधारित लागवड पद्धती वापरल्यास रताळे पिकातून चांगला नफा मिळू शकतो. एका अंदाजानुसार, एक हेक्टरमध्ये रताळ्याची लागवड केल्यास त्यातून सुमारे २५ टन उत्पादन मिळू शकते. बाजारात रताळ्याचा भाव १० रुपये किलो किंवा त्याहून अधिक आहे. जर तुम्ही २५ टन रताळे विकले तरी २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळू शकते.

## ओव्हरडोज म्हणजे काय ? कसा ओळखावा; फळ पिकांना कोणती योग्य पद्धती वापरावी

शेतकरी शेती करताना अधिक खतांचा व औषधांचा वापर करतात. त्याचा परिणाम शेत जमीनीवार होत असतो. फलबागा व भाजीपाल्याची वाढ खुंटते. पिकाना अधिक डोज दिल्यास कीडिंचा प्रदुर्भाव होतो. फळ झाडांना अधिक खते दिल्यास ते जमीनितील पोषक घटक शोषून घेण्यास असमर्थ ठरतात. फळझाडांना अधिक खते दिल्यास जमीनिवर त्याचे घातक परिणाम होतात. जमीनित जे पोषक सूक्ष्मजीव असतात त्यांच्या कार्य क्षमतेवर परिणाम होतो. मुळे अकार्यक्षम होतात.

रासायनिक खताचे मोठे तोटे : फळझाडे त्यांच्या मुळाशी जे पोषक घटक असतात त्यांच्याशी जुळवून घेते. त्यांची संगती चांगली झाली तर फलझाडे छान वाढतात व त्याचा फायदा उत्पादनवर होतो. म्हणजेच फळ लागवडीत योग्य प्रमाणात खत वापरले तर फळे चांगली लागतात. वनस्पती आणि मानव यांचे सारखेच आहे. जास्त जेवण म्हणजे माणूस सुस्त होतो. अर्थात योग्य प्रमाणात अन्न घेतले थोडे पोट रिकामे ठेवले तर माणसात स्फूर्ति उत्साह राहतो. माणूस चांगले काम करू शकतो. त्याचप्रमाणे योग्य पद्धतीने खते देणे आवश्यक आहे.

जास्त खते जास्त धोका : फळबागांना जास्त खते देणे हानिकारक आहे. शेतकरी बहुदा आपल्या पिकासाठी नायट्रोजन जास्त वापरतात. मोठ्या प्रमाणात नायट्रोजन वापर केल्यामुळे काही प्रमाणात नायट्रोजनचे बाष्पिभवन होते. तर काही प्रमाणात पाण्याद्वारे जमीनित जाते. यउलट ज्या पिकाना योग्य खते मिळतात त्यांची वाढ योग्य होते.



खतांचे प्रमाण जास्त होत असल्याचे परिणाम : १.झाडांची खालची पाने पिवळी पडतात किंवा सुकतात. २ पानाच्या कडा तपकिरी होतात. आतील शिरासुद्धा पिवळ्या पडतात. ३ झाडांची मुळे सुकतात, काळी पडतात, सडतात ४ फळझाडे वाढत नाही वाढ खूंटते, किंवा पाने गळतात.

खते जास्त दिल्या गेल्यास कोणते उपाय करावेत? : फळ झाडांना जास्त खते दिल्या गेल्यास अशा वेळी फळ झाडांना अधिक काळा पर्यंत सतत पाणी देत राहा. शक्य असल्यास मुळा जवळील खत असल्यास बाजूला करा. ज्यामुळे खतांचे प्रमाण कमी होवून पोषक घटकांचा पुरवठा होण्यास मदत होईल.

योग्य खोलीवर खतांचा वापर : पाण्यात विरघळणारी खते पृष्ठभागावर पसरवली जात नाहीत परंतु १० ते १५ सें.मी. खोलीवर असलेल्या आंतरपिकांना ट्रॉवेलच्या सहाय्याने दिली जातात किंवा ऊस, कापूस, भाजीपाला पिकांसाठी कुदळीच्या सहाय्याने खत जमिनीवर पसरवले जाते. खतातील पोषक घटक सक्रिय मुळांच्या जवळ आल्याने पोषक तत्वांची कार्यक्षमता वाढते. सोडियमची कमतरता कमी करते, फॉस्फरस स्थिरीकरण कमी करते. या पद्धतीचा वापर पेरणीपूर्व तसेच पेरणीनंतरच्या खतासाठी करता येतो. अघुलनशील रासायनिक खते आणि माती कंडिशनरसाठी ही पद्धत वापरू नका.

ओळींमध्ये पेरा : खते व बियाणे एकाच वेळी दोन नांगराने पेरल्याने खतांची कार्यक्षमता वाढते. दाणेदार खते पेरणीसाठी योग्य आहेत. या पद्धतीत खत बियाण्याच्या बाजूला दोन ते तीन सेंटीमीटर खाली आणि दोन ते तीन सेंटीमीटर खाली येते. त्यामुळे बियांचे नुकसान होत नाही. . मुळांद्वारे योग्य प्रमाणात शोषण केल्याने खतांची कार्यक्षमता वाढते.

युरिया खत बियाण्यांमध्ये मिसळून पेरणी करू नये : उभ्या पिकांमध्ये, प्रत्येक ओळीच्या एका बाजूला तणांच्या साहाय्याने उथळ चर तयार करून किंवा फावडे वापरून आणि खते टाकून मातीचे आच्छादन करावे. विशेषतः भाजीपाला पिके, लांब अंतरावरील पिके उदा. ही पद्धत मका, ज्वारी, ऊस, कापूस यासाठी उपयुक्त आहे. कोरडवाहू तसेच बागायती शेतीमध्ये, पेरणीच्या वेळी खताच्या दोन चरांचा वापर करणे ही उत्तम पद्धत आहे. या पद्धतीमुळे खतांचा कार्यक्षम वापर करून पिकांचा प्रतिसाद वाढू शकतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७९२ : केंटुकी अमेरिकेचे वे१५ राज्य बनले.
१७९६ : टेनेसी अमेरिकेचे वे१६ राज्य बनले.
१८३१ : सरजेम्स रॉस यांनी पृथ्वीच्या चुंबकीय उत्तर ध्रुवाचे स्थान निश्चित केले.
१८७४ : स्वातंत्र्य पूर्व भारतातील ब्रिटीश सरकारची इस्ट इंडिया कंपनी संपुष्टात आली.
१९२९ : प्रभात फिल्म कंपनीची कोल्हापूर येथे स्थापना.
१९३० : मुंबई व पुणे दरम्यान दख्खनची राणी ही रेल्वेगाडी सुरू झाली.
१९४५ : टाटा मूलभूत संशोधन संस्थेची भारतीय विज्ञान संस्थेच्या परिसरात स्थापना
१९५९ : द. गो. कर्वे पुणे विद्यापीठाचे तिसरे कुलगुरू झाले.
१९६१ : अमेरिकेतील फेडरल कम्युनिकेशन्स कमिशन ला जगात सर्वप्रथम स्टिरीओ एफ. एम. प्रसारणासाठी परवानगी मिळाली.
१९९२ : भारत व इजराईल या दोन देशांतर्गत हवाई मार्गाबाबत करार करण्यात आला.
१९९६ : भारताचे वे११ पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी सूत्रे हाती घेतली.
२००१ : नेपाळचे राजे वीरेंद्र, राणी ऐश्वर्या यांच्यासह अकरा जणांची युवराज दीपेंद्र यांनी निर्घृण हत्या केली.
२००३ : चीन मधील महाप्रचंड थ्री गॉर्जेस धरणात पाणी साठवण्यास सुरुवात झाली.
२००४ : रमेशचंद्र लाहोटी भारताचे वे३५ सरन्यायाधीश यांनी सूत्रे हाती घेतली.
२००७ : साली ब्रिटन देशांत सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास सक्त मनाई करण्यात आली.
२०१४ : नायजेरिया देशांतील फुटबॉल खेळाच्या मैदानात झालेल्या बॉम्बस्फोटा मध्ये ४० लोकांचा मृत्यू झाला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४२ : पहिले भारतीय सनदी अधिकारी सत्येंद्रनाथ टागोर यांचा जन्म. (मृत्यू: ९ जानेवारी १९२३)
१८४३ : फिंगरप्रिंटिंग चे जनक हेन्री फॉल्स यांचा जन्म. (मृत्यू: २४ मार्च १९३०)
१८७२ : मराठी कवी नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ कवी बी यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑगस्ट १९४७)
१९०७ : जेट इंजिन विकसित करणारे फ्रँक व्हाईट यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑगस्ट १९९६)
१९२६ : अमेरिकन अभिनेत्री मेरिलीन मन्रो यांचा जन्म. (मृत्यू: ५ ऑगस्ट १९६२)
१९२९ : नर्गिस दत्त, भारतीय अभिनेत्री.
१९३७ : मॉर्गन फ्रीमन, अमेरिकन अभिनेता.
१९३८ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी व लेखक बलदेव वंशी यांचा जन्मदिन.
१९४७ : मॅक्लारेन ग्रुप चे संस्थापक रॉन डेनिस यांचा जन्म.
१९६५ : इंग्लिश बुद्धिबळपटू नायगेल शॉर्ट यांचा जन्म.
१९७० : आर. माधवन, हिंदी चित्रपट अभिनेता.
१९७५ : भारतीय सर्वोच्च क्रीडा सन्मान राजीव गांधी खेळ रत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार तसचं, पद्मश्री पुरस्कार सन्मानित पहिल्या भारतीय ऑलिम्पिक पदक विजेता भारतीय भार्तोलन खेळाडू कर्णम मल्लेश्वरी यांचा जन्मदिन.
१९८५ : भारतीय क्रिकेटपटू दिनेश कार्तिक यांचा जन्म.
१९९१ : भारतीय युवा महिला क्रिकेटपटू राजेश्वरी गायकवाड यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३० : भारतीय धार्मिक नेते स्वामीनारायण यांचे निधन. (जन्म: ३ एप्रिल १७८१)
१८६८ : अमेरिकेचे १५ वे राष्ट्राध्यक्ष जेम्स बुकॅनन यांचे निधन. (जन्म: २३ एप्रिल १७९१)
१८७२ : न्यूयॉर्क हेरॉल्ड चे स्थापक जेम्स गॉर्डन बेनेट यांचे निधन. (जन्म: १ सप्टेंबर १७९५)
१९३४ : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, प्रसिद्ध नाटककार आणि विनोदी लेखक.
१९४४ : आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर यांचे निधन. (जन्म: १८ मार्च १८६७)
१९६० : जर्मन-ऑस्ट्रियन बहीण पॉड हिटलर यांचे निधन. (जन्म: २१ जानेवारी १८९६)
१९६२ : दुसर्या महायुद्धात शेकडो ज्यू लोकांची कत्तल करणार्या ॲडॉल्फ आइकमॅन या जर्मन सेनापतीला इस्त्रायलमधे फाशी देण्यात आले.
१९६८ : अंध मूकबधिर असूनही कला शाखेची पदवी मिळवलेल्या पहिल्या व्यक्ती आणि समाजसेविका हेलन केलर यांचे निधन. (जन्म: २७ जून १८८०)
१९८४ : हिंदी-मराठी चित्रपट अभिनेते नाना पळशीकर यांचे निधन.
१९८७ : दिग्दर्शक, पटकथाकार आणि लेखक के.ए. अब्बास यांचे निधन. (जन्म: ७ जून १९१४)
१९९६ : नीलम संजीव रेड्डी, भारताचे सहावे राष्ट्रपती.
१९९८ : गो. नी. दांडेकर, ज्येष्ठ साहित्यिक.
१९९९ : होव्हर्क्राफ्ट चे निर्माते शोध ख्रिस्तोफर कॉकेरेल यांचे निधन. (जन्म: ४ जून १९१०)
२००० : एकपात्री कलाकार मधुकर महादेव टिल्लू यांचे निधन.
२००१ : नेपाळचे राजे वीरेन्द्र यांची हत्या. (जन्म: २८ डिसेंबर १९४५)
२००२ : दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेट कप्तान हॅन्सी क्रोनिए यांचे विमान अपघातात निधन. (जन्म: २५ सप्टेंबर १९६९)

# शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृती श्लोकांना विरोध हिच खरी आदरांजली: डॉ.गणेश ढवळे

## लिंबागणेश येथे कर्मयोगिनी पुण्यश्लोक अहिल्यामाई होळकर जयंती साजरी

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे.लिंबागणेश येथे आज दि.३१ मे शुक्रवार रोजी कर्मयोगीनी पुण्यश्लोक अहिल्यामाता होळकर यांची त्रिशताब्दी जयंती ग्रामपंचायत कार्यालय येथे माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून अहिल्यामाता होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.ह.भ.प. अनंतकाका मुळे यांनी अहिल्यामाता यांचा जीवनपट उलगडून सांगताना अहिल्यामाता यांच्या शासन व्यवस्थेच्या कालावधीत अनेक धार्मिक स्थळांचा जिर्णोद्धार केला.धर्मशाळा रस्ते, दवाखाना यांची निर्मिती करताना वस्तुशिल्पी, शिल्पकार, गवंडी, लोहार, सुतार,सोनार, चर्मकार अशा अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.



कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांना मदतीचा हात देताना करवसुलीची मर्यादा निश्चित ठरवून दिली त्यामुळे शेतकऱ्यांना जादा शेतसारा द्यावा लागत नसे.शेती पुर्णतः पाण्यावर अवलंबून असल्याने तलाव, विहीर घाट,कुंडाची निर्मिती केली.यावेळी बाळासाहेब मुळे रमेश गायकवाड, समीर शेख,नाना वाणी यांची समयोचित भाषणे झाली.कार्यक्रमांचे सुत्रसंचलन बाळासाहेब मुळे यांनी तर आभारप्रदर्शन डॉ.गणेश ढवळे यांनी केले. ग्रामपंचायत कार्यालय ते पुण्यश्लोक अहिल्यामाता होळकर चौकापर्यंत ढोलताशांच्या गजरात मिरवणूक काढत अहिल्यामाता होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले. घोषणांनी परीसर दुमदुमला होता.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात,ग्रां.स.श्रीहरी निर्मळ,दामु थोरात,महादेव कुदळे, अर्जुन घोलप,अशोक जाधव, जीवन मुळे,कल्याण वाणी, भगवान मोरे, रामचंद्र मुळे, भालचंद्र गिरे, अॅड.गणेश वाणी, सुखदेव वाणी,गणपत तागड, संतोष भोसले,रामदास मुळे, शिवाजी वाणी,दादा गायकवाड ,संजय घोलप, सुरेश ढवळे,संदिप मुळे,नवनाथ मुळे,श्याम गिरे, विशाल लगास,शहादेव धलपे , रामकिसन गहिरे,शुभम कोकाटे, विनायक वाणी,सुदाम गिरे, रामचंद्र गिरे, चंद्रकांत आवसरे आदि ग्रामस्थ उपस्थित होते. अहिल्यामाता होळकर यांनी राज्यकारभार चालवताना अनिष्ट रूढी , समाजविघातक परंपरा यांना पायबंद घातला. सती प्रथा बालविवाह ,केशवपन या अनिष्ट प्रथा त्यांनी बंद केल्या.त्यासाठी कठोर कायदे करून अंमलबजावणी केली अहिल्यादेवींच्या विचारांचा आणि कार्याचा दैदिप्यमान वारसा सांभाळत वाटचाल करताना ज्या मनुस्मृतीत बहुजण समाजावर आणि महिलांवर अन्याय करणारे श्लोक आहेत ज्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन केले होते त्या मनुस्मृतीच्या श्लोकांचा महाराष्ट्र शासनाच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक समाविष्ट करण्यात यावेत या प्रस्तावाला कडाडून विरोध करणे हिच पुण्यश्लोक अहिल्यामाता होळकर यांना आदरांजली ठरेल असे प्रतिपादन केले.

## अनन्या क्षीरसागरने मिळविले ९७.२०% गुण

परळी । प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ एस एस सी बोर्डाकडून घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत परळीच्या न्यू हायस्कूल मध्ये शिकत असलेली कु अनन्या सदानंद क्षिरसागर हिने ९७.२०% गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले.



अगदी लहानपणापासून अभ्यासामध्ये हुशार असलेली अनन्या क्षीरसागर हिने परमेश्वराने दीड वर्षांपूर्वी वडिलांची छत्रछाया हिरावून घेतल्यानंतरही अभ्यासामधील आपली कर्तबगारी कायम ठेवली. अनन्यास अभ्यासामध्ये तिची आत्या बहीण डॉक्टर प्रगती चौधरी हिचे वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन लाभले त्याचबरोबर संजय क्षीरसागर, सुरेखा क्षीरसागर दीपा क्षीरसागर यांनी देखील अभ्यासामध्ये तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून कोणत्याच गोष्टीची कमतरता भास होऊ दिली नाही. अनन्यास १००% गुण मिळतील अशी खात्री होती मात्र ९७.२० टक्यावरच तिला समाधान मानावे लागले. अनन्यास पुढे नीट ची तयारी करून पुढे तिला डॉक्टर व्हायचे आहे. आपल्या यशाचे श्रेय अनन्या आपले शिक्षक शहापूरे सर, शास्त्री सर व सुरवसे सर यांना देते. एसएससी शालांत परीक्षेत मिळालेल्या मोठ्या यशाबद्दल अनन्या क्षीरसागर हिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून अनेकांनी तिला भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## तेलगाव खुर्द येथे जलजिवनचे निकृष्ट काम ; कार्यकारी अभियंत्यास निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील तेलगांव खुर्द येथे जलजिवन मिशन योजनेअंतर्गत करण्यात आलेले पाणीपुरवठ्याचे काम निकृष्ट करण्यात येत असल्याने संबंधित गुत्तेदारास या कामाची चौकशी होईपर्यंत देयके देउ नयेत असे निवेदन पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यास भाजपचे युवा नेते रमेश शेंडगे यांनी दिले आहे.



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जल जिवन मिशन योजनेअंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम करण्यात येत असून विहीर नियोजित जागेत न खोदता नदीच्या पात्रात जिथे पावसात पाणी आल्यानंतर विहीर पूर्णपने बुजुन जाईल अशा अवस्थेत बांधण्यात आली आहे. पाईपलाईनचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे करण्यात आले नाही. पाण्याच्या टाकीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आलेले आहे. त्यामुळे संबंधित गुत्तेदारास या कामाची चौकशी होईपर्यंत देयके देउ नयेत अशी मागणी पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्याकडे भाजपचे युवा नेते रमेश शेंडगे यांनी केली आहे.

## मनुस्मृतीला शालेय अभ्यासक्रमातून लादण्याचा प्रयत्न खपवून घेणार नाही -कवडे

पाटोदा । प्रतिनिधी

अखंड हिंदुस्तानचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक नाकारणारी वर्ण व्यवस्था म्हणजे मनुस्मृति ती कदापी शालेय पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करू नये यामुळे आज पाटोदा तहसील कार्यालया समोर शेतकरी नेते गणेश कवडे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारला ती मनुस्मृति घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दहन करून शिवाजी महाराजांचे स्वराज्य संविधानाच्या माध्यमातून संपूर्ण देशाला बहाल केलं आणि त्याच छत्रपती शिवाजी



महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये अभ्यासक्रमातून मनुस्मृती आणून राज्य शासन नव्याने वर्ण व्यवस्था लादण्याचा प्रयत्न करू पाहत आहे.

अभ्यासक्रमात मानवाला जगण्यासाठी घटनेने दिलेले हक्क अधिकार कर्तव्य याबाबत विचार करून तो वयोगटा नुसार अद्याप विद्यार्थ्यांना दिला पाहिजे परंतु राज्य शासनाला राज्यात ही बाब न आणता वर्णव्यवस्था आणून बारा बलुते अठरा आलूते अशी समाज व्यवस्था पुन्हा तयार करण्याची तयारी करत आहे. असे झाल्यास सरकारच्या विरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन येणाऱ्या काळात करण्यात येईल असा निवेदनाद्वारे इशारा दिला.

यावेळी या आंदोलनासाठी शेतकरी नेते गणेश कवडे, ज्येष्ठ नेते भाई विष्णुपंत घोलप, इम्रान शेख, विठ्ठल नाईकवाडे,वाहेद भाई पठाण, निलेश जावळे, दिलीपराव गाडेकर,जय जावळे ,रोहन जाधव, नागेश पाटोळे, जाहिद पठाण इत्यादी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

मनुवादी विचारांच्या हातामध्ये सत्ता दिल्याने देशाच वाटोळ झाले आहे पहिल्यापासूनच मनुस्मृति विचाराचे लोक माणसाला माणसापासून दूर करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आता तर हद्दच केली चक्क छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक नाकारणारी वर्णव्यवस्था म्हणजे मनुस्मृती तिलाच आता शालेय पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करून विद्यार्थ्यांच्या मनावर मनुस्मृती रुजवण्याचा सुरू केलेला हा हुकूमशाहीचा प्रयत्न त्याला छत्रपती शिवराय, आंबेडकरवादी विचाराचे आम्ही सर्व कदापि सहन करणार नाहीत या मनुवादी विचारांचा डाव हाणून पाडण्यासाठी आम्ही लढा उभा करू आणि लढत राहू असा इशारा गणेश कवडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना दिला.

## तुलसी महाविद्यालयात जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

तंबाखूचे केवळ मानवांवरच नव्हे तर मोठ्या प्रमाणावर पर्यावरणावर होणारे हानिकारक परिणाम अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिन पाळला जातो. यानिमित्त तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने तंबाखू विरोधी दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.एम.थोरात, उपप्राचार्य डी.जी.निकाळजे, एनएसएस विभाग प्रमुख प्रा.सुरेश कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी तंबाखूविरोधी शपथ ग्रहण




केली. तंबाखू,खर्रा,(जर्दा) धुम्रपान ह्यांच्या दुष्परिणामाची मला जाणीव आहे. म्हणून मी जन्मभर,ह्या व्यसनापासुन दूर राहण्याचा संकल्प करीत आहे. माझे घर आणि माझा आजुबाजुचा परीसर तंबाखूमुक्त राहावा,इतरांनी तंबाखूजन्य पदार्थांचा परीत्याग करावा ह्यासाठी मी प्रयत्न करीन. माझे घर,माझे गाव (शहर) आणि माझा महाराष्ट्र तंबाखूमुक्त बनवेल अशी शपथ घेतली.यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला कला महाविद्यालयात जागतिक तंबाखू विरोधी दिन

बीड । प्रतिनिधी

येथील माऊली विद्यापीठ संचलित महिला कला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे दिनांक ३१ /५/ २०२४ रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिन कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर होत्या. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ .संध्या आयस्कर यांनी जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शपथ देण्यात आली. प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांनी सांगितले की ,आरोग्याच्या दृष्टीने तंबाखु सेवन करणे घातक आहे.

प्रत्येकाने आपले गाव, शाळा, महाविद्यालय, शहरातील व्यक्तींना तंबाखू सेवनापासून दूर ठेवण्याचे कार्य करणे गरजेचे आहे. तंबाखूचे दुष्परिणाम सर्वांसमोर मांडण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.बबन बोबडे यांनी केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## 'हम दो हमारे बारह' चित्रपट बीड जिल्ह्यात प्रदर्शित होऊ देणार नाही- अॅड. शेख शफिक

बीड । प्रतिनिधी

सध्या वादग्रस्त ठरत असलेला व प्रदर्शनाच्या मार्गावर असलेला हिंदी चित्रपट हम दो हमारे बारह हा समाजासमाजात कलह आणि वाद निर्माण करणारा चित्रपट असल्याने समाजात शांतता भंग होण्याचा धोका असल्याने हा चित्रपट बीड जिल्ह्यात प्रदर्शित होऊ देणार नाही असे एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष अॅड. शेख शफिक भाऊ यांनी म्हटले आहे. याविषयी एआयएमआयएम पक्षाकडून बीड जिल्हाध्यक्ष अॅड. शेख शफीक भाऊ यांनी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना निवेदन देऊन राष्ट्रपती, गृहमंत्री, केंद्रीय फिल्म प्रमाणन बोर्ड (सेन्सर बोर्ड) चे चेअरमन, केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, आणि गृहमंत्री यांनाही निवेदन पाठविले आहे.

यावेळी बोलताना शफिक भाऊ म्हणाले की, हा चित्रपट इस्लाम धर्म व मुस्लिम समाजाविषयी चुकीचे चित्रीकरण करून बनविण्यात आला आहे. आणि



भारतीय जनता पक्षाची सत्ता आल्यापासून देशात भारतीय जनता पक्षाची सत्ता २०१४ मध्ये आल्यापासून मुस्लिम विरोधी चित्रपट सातत्याने प्रदर्शित होत आहे. समाजासमाजात तेढ, तिरस्कार, चिड निर्माण करणारी व स्वतःच्या फायद्यासाठी जातीय दंगली घडवण्याकरिता हे काम करत आहेत. अशा चित्रपटांना सेन्सार बोर्ड हे कोणाच्या सांगण्यावरून व कोणाच्या फायद्यासाठी चित्रपट प्रदर्शित करण्याची परवानगी देतात ? हा एक मोठा प्रश्न आहे.

### पोलीस अधीक्षकांनी दिले आश्वासन

या चित्रपटाविषयी अॅड. शेख शफीक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने कर्तव्यदक्ष बीड जिल्हा पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकुर यांची भेट घेऊन या चित्रपटाविषयी निर्माण झालेली जनभावना विषद केली. तेव्हा पोलिस अधीक्षकांनी सकारात्मक प्रतिसाद देत बीड जिल्ह्यात हा चित्रपट प्रदर्शित होणार नाही असे आश्वासन दिले.

विशेष करून मुस्लिम समाजातील महीलांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे, आणि मुस्लिम समाज व इतर जाती मध्ये विष पेरण्याचे कारस्थान आहे. व धर्म कोणताही असो त्यात इतर धर्मियांनी नाक खूपसून कोणताही एक धर्म किंवा त्या धर्मात असलेल्या आचारसंहितेचे चुकीच्या पद्धतीने प्रदर्शन करू नये. हम दो हमारे बारह या चित्रपटात नेमके तेच करण्यात आले आहे.

चित्रपट बनविणाऱ्यांची ही कृती इस्लाम धर्मासह मुस्लिम समाजाला विनाकारण बदनाम करण्याचे षडयंत्र आहे. यामुळे मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला आहे. हा चित्रपट जर चित्रपटगृह मध्ये प्रदर्शित करण्यात आला तर शांतता भंग होण्याची व अनुचित प्रकार घडण्याची शक्यता आहे. इस्लाम आणि मुस्लिमांविषयी गरड ओकणारा हम दो हमारे बारह हा चित्रपट बीड जिल्ह्यात प्रदर्शित करू नये, या चित्रपटावर कायमस्वरूपी बंदी घालावी.

हा चित्रपट निर्माण करणारा निर्माता, बनविणारा दिग्दर्शक आणि यातील कलाकारांवर गुन्हे दाखल करण्यात यावे. अशी मागणी ही एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष अॅड. शेख शफिक भाऊ यांनी केली आहे. जर हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आलाच तर एआयएमआयएम पक्ष लोकशाही मार्गाने हा चित्रपट बंद पाडेल, असा इशाराही दिला आहे. यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते अब्दुस्सलाम सेठ, नगरसेवक अजहर मोमीन, शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, तालुका उपाध्यक्ष साजन चौधरी, युवक शहराध्यक्ष शेख सलमान, तालुका सचिव लियाकत बेग, बांधकाम शहराध्यक्ष सय्यद बासेद, वार्ड अध्यक्ष शेख नेहाल, मार्गदर्शक रियाज खान, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली आदी पदाधिकारी उपस्थित होते.

थोडक्यात



### अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन

बीडः पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती आज बीड येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी बीड येथील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी धनगर समाज संघटनेचे अध्यक्ष प्रकाश भैया सोनसळे ,भरत भैया गाडे ,श्याम गाडेकर जिल्हा उपाध्यक्ष, रील स्टार कोंडू तात्या वाघमोडे,सोमनाथ कुदवन, दत्ता काळे सचिव बीड ,अंकुश वैद्य ,अरुण काकडे तालुका अध्यक्ष पाटोदा, अमोल भोंडवे युवक तालुका अध्यक्ष पाटोदा, शिवाजी डफळ, गर्जे साहेब, खेडकर साहेब ,आबा शिंदे, परशुराम सापणकर, शिवलिंग प्रभाळे, आदींच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाली.



### घाटनांदूर येथे अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

घाटनांदुर : अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या जयंतीच्या निमित्ताने ३१ मे रोजी सकाळी ९ वाजता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर चौक, ग्रामपंचायत कार्यालय व छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी मान्यवरांच्या व धनगर समाज बांधवांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समितीचे अध्यक्ष प्रशांत वैद्य, सरपंच महेश गारटे, बाळासाहेब देशमुख, दत्ता जाधव, ज्ञानोबा जाधव, गोविंद वैद्य, रंगनाथ गाडवे ,गोपाळ गाडवे, संतोष गाडवे ,राम वैद्य, दादा वैद्य,भाजपा तालुका युवा मोर्चा उपाध्यक्ष प्रदीप भैय्या वैद्य व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्सव समितीचे सर्व सदस्य व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

### पिंपळवंडी येथे अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



पिंपळवंडी : पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती साजरी करण्यात आली.प्रथम राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन पुष्पहार अर्पण करून व श्रीफळ फोडून विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी सरपंचपती निलेश मोरे,उपसरपंच दादासाहेब पवार,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार,शिवसेना उबाठा उपतालुकाप्रमुख अशोक पवार तसेच माजी उपसरपंच दादासाहेब पवार,पवळ पोस्टमास्तर,भारत पवार,सतीश पवार,बिबीशन पवार,सत्यवान जाधव,श्रीकांत उकांडे,ज्ञानेश्वर शिंदे,महादेव शिंदे,विकास पवार आदी उपस्थित होते.

### पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी



पाटोदा - येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते प्रतिमापूजन व पुष्पमाला अर्पण करण्यात आली. याप्रसंगी प्रोफेसर प्रशांत पाटील, भाऊसाहेब यादव,रामकृष्ण वनवे, बाळासाहेब चौरे, शहाजी जाधव, बाबासाहेब मुंडे, बाबासाहेब नाईकनवरे, श्रीमती माधुरी पुराणिक यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन बाळासाहेब चौरे यांनी केले.

### स्वामी अमृत भारती विद्यालयाचा १०० टक्के निकाल

पिंपळवंडीः पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.गंगाभारती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री.स्वामी अमृत भारती माध्यमिक विद्यालयाचा शैक्षणिक वर्ष मार्च २०२३-२४ या वर्षाचा एस.एस.सी बोर्ड परीक्षेचा निकाल १००% लागला असून या शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.या विद्यालयाचे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.यामध्ये प्रथम आरती गंगाधर जरे ९५.४०%,द्वितीय स्वाती रामहरी पवार ९४.२०% तर तृतीय यश मच्छिंद्र भालेकर ९३.८०% घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.तसेच शाळेचे २२ विद्यार्थी ९० पेक्षा जास्त टक्के गुण मिळवून गुणवंत ठरले आहेत.सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थाप्रमुख तथा श्री अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती गुरुवर्य महंत स्वामी महादेवानंद भारती महाराज तसेच परमानंद भारती महाराज,मुख्याध्यापक पवार व सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,पालक वर्ग आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.


# टेम्पो -अॅपे रिक्षा अपघातात रिक्षा चालकाचा मृत्यू

## घाट रुंदीकरणाच्या मागणीकडे शासनाच्या दुर्लक्षामुळे निष्पाप नागरिकांना गमवावे लागतायेत जीव

किल्ले धारूर । प्रतिनिधी

खामगाव पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावर धारूर शहरालगत घाटातील रुंदीकरण झाल्यामुळे अपघाताची मालिका सुरूच आहे आज दुपारी टेम्पो आणि रिक्षाचा अपघात होऊन अॅपे रिक्षा चालक माऊली भास्कर घुले यांचा मृत्यू झाला याला प्रशासनाची निष्क्रियता जबाबदार असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

खामगाव पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण झाले असले तरी धारूर शहरा लगत असणाऱ्या घाटातील रस्त्याचे रुंदीकरण झालेच नाही शहरातील सामाजिक कार्यकर्ते पत्रकार यांनी घाटाच्या रुंदीकरणासाठी शासनाकडे वेळोवेळी मागणी करूनही रस्त्याचे रुंदीकरणाचे काम झालेच नाही त्यामुळे घाटामध्ये नेहमीच अपघात होत आहेत यामध्ये अनेक सामान्य नागरिकांना घाटातील अरुंद रस्त्यामुळे आपली जीव गमवावे लागले. अरणवाडी साठवण तलवाजवळ टेम्पो आणि अपे रिक्षा यांच्यात धडक झाल्यामुळे अपे रिक्षा चालकाला आपला जीव गमवावा लागला घाटाचे रुंदीकरण झाले असते तर अपघातात नागरिकांना जीव गमवावे लागले नसते घाटाच्या रुंदीकरणाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावून सर्वसामान्य नागरिकांना शासनाने दिलासा द्यावा अशी मागणी तालुक्यातील नागरिक करत आहेत.





केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची लातुर येथे धारूर शहरातील शिष्टमंडळाने प्रत्यक्ष भेट घेऊन घाट रुंदीकरणाचे निवेदन दिले होते तसेच शहरातील हजारो नागरिकांच्या सह्यांचे निवेदन ईमेलद्वारे व पोस्टाद्वारे पाठवूनही त्याची गंभीर दखल न घेतल्यामुळे अरुंद घाटामध्ये सर्वसामान्य नागरिकांना जीव गमवावे लागत आहेत. घाट रुंदीकरणाचा प्रश्न केंद्र व राज्य सरकारने गांभीर्याने सोडवावा.

विजय शिनगारे सामाजिक कार्यकर्ते धारूर

खामगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग वर असलेल्या धारूर घाटाचे चे रुंदीकरण करणे गरजेचे असल्याबाबत अनेक वेळा वर्तमानपत्रातून बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत परंतु याकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे घाटातील अपघातत सर्वसामान्य नागरिकांना जीव गमवावे लागत आहेत.

-अतुल शिनगारे पत्रकार धारूर.

## शेख महेकचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

पाटोदा । प्रतिनिधी



महाराष्ट्रराज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून मार्च २०२४ मध्ये दहावीच्या परिक्षा घेण्यात आल्या.या परीक्षेचा निकाल सोमवारी दि.२७ रोजी जाहीर झाला.यामध्ये बीड जिल्हा टॉप मध्ये राहिला आसुन पाटोदा तालुक्यातील प्रियदर्शनी शाळेतील विद्यार्थी शेख महेक जमीर हिने आपल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात देत दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्यामुळे तिचे सर्वच थरातून अभिनंदन होत आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परिक्षेत कुमारी शेख महेक हिने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले.त्याबद्दल शेख परिवाराने तिचे पेढे भरून तोंड गोड करीत अभिनंदन केले.शेख महेक हिने मिळालेल्या आपल्या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना म्हणाली की,''माझी आई -आणि माझ्या शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे हे यश प्राप्त करू शकले.

## अहिल्याबाई होळकर या एक कुशल प्रशासकच नव्हे तर पराक्रमी योध्या होत्या -राजकिशोर मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राजमाता अहिल्याबाई होळकर या एक कुशल प्रशासकच नव्हे तर पराक्रमी योध्या होत्या असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले. ते राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करतांना बोलत होते. याप्रसंगी माजी उप नगराध्यक्ष मनोज लखेरा, महादेव आदमाणे, तानाजी देशमुख, अंकुश हेडे, विष्णू सरवदे, नाईक सर, नवनाथ चौरे, नितीन काळे, विठ्ठल काळे, विष्णू पांचाळ, यांच्यासह अनेकजन उपस्थित होते.

यावेळी सर्वप्रथम अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यांच्या आयुष्यातील संघर्षावर प्रकाश टाकण्यात आला. राजमाता




अहिल्याबाई यांनी आपल्या प्रदेशभर बारवं (विहिरी), तलाव, कुंड, घाट व पूल बांधले आजच्या शासनाला अजूनही चांगल्या पद्धतीने जमत नाही ते अहिल्याबाईंनी सहजपणे दूरदृष्टीने केले. आपल्या राज्यातील उद्योगधंद्याला त्यांच्या विकासाला प्राधान्य दिले. भिल्ल, रामोशी अशा आदिवासी जमातींचे पुनर्वसन करून मानवताधर्म जोपासणाऱ्या व वाढवणाऱ्या एकमेव महिला राज्यकर्त्या म्हणून त्यांचा उल्लेख गौरवाने करावा लागेलं असे स्पष्ट मत राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. राजमाता अहिल्यादेवींनी आपली सात्विकता, स्वामीनिष्ठा, धाडस, पराक्रम, हिंदू धर्मावरील प्रेम, अध्यात्मिक बळ, भूतदया आणि जोपासलेला भाईचारा इत्यादिकांच्या जोरावर संपूर्ण स्वराज्याला, गौरवास्पद मराठेशाहीला संपूर्ण जगभरात प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे ◀◀ पान ३ वर



बीड : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अ. भा. महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा सिनेट सदस्य अॅड. सुभाष भाऊ राऊत, धनगर समाज कर्मचारी महासंघाचे प्रदेश अध्यक्ष मा.अंकुशजी निर्मळ, गुरव समाजाचे अध्यक्ष मा.संजयजी गुरव, नितीन राऊत, वैभव गोरे, वैभव खेत्रे, संतोष यादव, आदींसह समता सैनिक उपस्थित होते.

## जिल्हाधिकाऱ्याला पाणी टंचाईपेक्षा बांधकाम किंमत वाढीची चिंता

### शासकीय-खासगी बांधकाम थांबविण्यास जिल्ह्याधिकारी यांची टाळाटाळ-अजय सरवदे



बीड जिल्ह्यासह शहरामध्ये इतर ठिकाणी पाणी टंचाईचा सामना सर्वसामान्यांना करावा लागत आहे. एसीमध्ये बसून काम करणाऱ्या अन बिस्लरीचे पाणी पिनाऱ्या अधिकाऱ्यांना काय कळणार? पाण्याअभावी माणसं मेली तरी चालेल परंतु राज्य महामार्गाचे, सरकारी व खासगी बांधकामे चालू राहिली पाहिजे अशी भूमिका जिल्हाधिकारी बीड यांची दिसत आहे. यामुळे भिषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे यास जबाबदार जिल्हाधिकारी बीड याच असतील.

अजय सरवदे, युवा नेते, वंचित बहुजन आघाडी बीड

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पाणी टंचाईने गंभीर स्वरूप धारण केले आहे. जिल्ह्यात पाणीसाठा अत्यल्प असल्यामुळे राज्य महामार्ग शासकीय बांधकामे जोमात सुरू असून त्यासाठी लाखो लिटर पाणी वापरले जात आहे ते बांधकाम थांबावे म्हणून वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते अजय सरवदे यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे तक्रार दिली होती. शासनाचे निर्देशानुसार अल- निनो समुद्र प्रवाह सक्रियतेच्या प्रभावामुळे सन २०२३ मध्ये अपुरे पर्जन्यमान होण्याची शक्यता लक्षात घेऊन ◀◀ पान ३ वर

## मतमोजणी प्रक्रियेची प्रशासकीय तयारी पूर्ण -जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

मतमोजणी प्रक्रियेत सूक्ष्म निरीक्षकांची महत्त्वाची भूमिका असून सूक्ष्म मतमोजणी प्रक्रियेत सूक्ष्म निरीक्षकांची महत्त्वाची भूमिका असून हे निरीक्षक निवडणूक निरीक्षकांचे प्रतिनिधी म्हणून काम करतात त्यामुळे सूक्ष्म निरीक्षकांनी अधिक सजग राहून मतमोजणीच्या प्रक्रियेत सहभाग नोंदवतील. यावेळी पोलीस अधीक्षकांनी या ठिकाणी असलेल्या संरक्षक कड्याबाबत माहिती दिली. पहिल्या कड्यांमध्ये केंद्राचे जवान, त्यानंतर राज्याचे जवान आणि त्यानंतर पोलीस असे सुरक्षा कवच या ठिकाणी राहणार असून उमेदवारांच्या प्रतिनिधींनी कुठल्याही नियमाचे उल्लंघन न करता शांततेत प्रक्रिया पार पाडण्यास मदत करावी तसेच



उमेदवारांनी मतदान प्रक्रियेमध्ये आणि त्यानंतर आपापल्या समर्थकांना शांतता आणि संयम राखण्याचे आवाहन सोशल मीडियावरून करावे अशी विनंती त्यांनी यावेळी केली .

या पत्रकार परिषदेला अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक बोल्डे, उपजिल्हाधिकारी कांबळे जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सूक्ष्म निरीक्षक हे निवडणूक निरीक्षकांचे प्रतिनिधी म्हणून निवडणूक प्रक्रियेचा भाग असतात मतमोजणीच्या प्रक्रियेतही सूक्ष्म निरीक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. मतमोजणी कक्षात एक सुपरवायझर एक सहाय्यक आणि सूक्ष्म निरीक्षक असे तीन लोक असतात. मतमोजणीच्या वेळी प्रत्येक उमेदवाराला मिळालेले मत हे इंग्रजी भाषेत लिहायचे असून ते नीट लिहिले की नाही याची उलट तपासणी सूक्ष्म निरीक्षक हे करत असतात. सूक्ष्म निरीक्षक हे केंद्र शासनाच्या विविध विभागातले अधिकारी कर्मचारी आहेत. सूक्ष्म निधीक्षक हे थेट निवडणूक निरीक्षकांना रिपोर्टिंग करतील. प्रत्येक फेरीत १४ मतदान केंद्रांचे मतमोजणी केली जाणार असून कुठल्याही दोन मतदाना केंद्रांची सी यु हे सूक्ष्म निरीक्षकांच्या माध्यमातून निवडणूक निरीक्षक त्याची उलट तपासणी करतील. उमेदवारांच्या प्रतिनिधीनाही मोजणी व्यवस्थित होते की नाही हे व्यवस्थित पाहता येईल याबरोबरच आपण घेतलेली आकडेवारी आणि निरीक्षकाने मांडलेली आकडेवारी एकच आहे की नाही हे ही पाहता येईल याबरोबरच माध्यम प्रतिनिधींना वेळोवेळी याची माहिती माध्यम कक्षात दिली जाईल. त्यांना प्रत्यक्ष मतदानाच्या ठिकाणीही जाता येईल. निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि व्यवस्थित पार पाडण्यासाठी सर्व उपाययोजना करण्यात आल्या असून एकाच वेळी १४ टेबलवर १४ राऊंड होतील .यासाठी प्रत्येक ठिकाणी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित असतील. याबरोबरच सुक्ष्म निरीक्षक आणि मुख्य निरीक्षक ही या ठिकाणी उपस्थित असतील. निवडणूक मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पाडावी म्हणून सर्व उमेदवार त्यांचे प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी केले. याच वेळी ◀◀ पान ३ वर

## मोबाईल,फोर जी इंटरनेच्या युगात ग्रामीण भागातील पारावरील गप्पा थांबल्या!

### एका ठिकाणी जमूनही एकत्र नाहीतच; गप्पांचे क्लब सुरु करणे काळाची गरज

ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव

मोबाईल,फोर जी, इंटरनेच्या अधिकाधिक वापरामुळे माणूस एकटा पडत चालला असून पारावर जाऊन मित्रांशी गप्पा मारणे हा प्रकार जवळपास थांबल्यात जमा आहे.फोर जीच्या सुरुवातीपासून ही समस्या वाढण्यास सुरुवात झाली असून आज मोबाईलशिवाय राहाणे,ही कल्पनाही करणे अवघड होत चालले आहे.

मोबाईल इंटरनेट वेगवान होण्याच्या आधी फावल्या वेळेत कुणाकडे तरी जाऊन बसणे व गप्पा मारणे हा बऱ्याच व्यक्तींचा आवडता उद्योग असायचा.ग्रामीण भागात तर दिवसभर पारावर म्हणा किंवा ग्रामपंचायतीच्या कार्यालयासमोर गप्पा मारताना कुणी ना कुणी बसलेले असायचे.हॉटेल, चहाची टपरी,पान टपरी असो वा किराणा दुकान, कायम एक टोळके गप्पा मारताना दिसायचे.या गप्पा





आता कुठेतरी हलवलेल्या दिसत आहेत.

गावातील पार म्हणजे आताच्या पिढीला माहिती नसले,तरी पस्तीशी-चाळीशीत असलेल्या लोकांनी पारावर जाऊन गप्पा मारलेल्या आढळेल.जिथं घरातल्या समस्यांपासून थेट देशाच्या राजकारणापर्यंत गप्पा मारल्या जातात,ते ठिकाण म्हणजे गावातील पार,याच पारावर पूर्वी गावातल्या गावातील समस्यांवर न्याय निवाडा केला जायचा.नंतर हे ठिकाणी गप्पांचे ठिकाण बनले.हे पार जवळपासू प्रत्येक गावात आढळते.हा पार आता केवळ कथेतील भाग बनत चालला आहे.हे पार कधीपासून अस्तित्वात आले, याबद्दल कुठे पुरावा मिळत नसला,तरी हे पार म्हणजे गावातील ग्रामस्थाला व्यक्त होण्याचे एक हक्काचे ठिकाण होते.येथे आल्यानंतर गावात काय चालले,याची इत्यंभूत खबर मिळत असायची. महत्वाचे महणजे गावातील प्रत्येक हालचालीवर नजर ठेवता यायची.सर्व जाती धर्माची लोकं येथे येऊन गप्पा कुटायची.हे पार म्हणजे काय? असा प्रश्न नवीन पिढील पडत असेल,तर गावाच्या महत्वाच्या मध्यवर्ती भागात एखादद्या मोठ्या झाडाभोवती दगडांनी बांधलेले गोल बांधकाम म्हणजे पार.दिवस मावळू लागला की दमलेले पाय या पाराकडे वळू लागायचे.रात्रीच्या जेवणाच्या वेळीपर्यंत लोक या पारावर बसून गप्पा मारायचे.दिवसभर वृद्ध मंडळी या पारावर बसून गप्पा मारायच्या तर तरूण सायंकाळी शेतावरून आल्यानंतर येथे यायचे.अनेक पुरुष मंडळी रात्रीचे जेवण झाल्यानंतरही पारावर गप्पा मारायला यायचे.आता मात्र परिस्थिती बदलली आहे.गप्पांचा वेळ आता मोबाईलवर खर्च होऊ लागला आहे.जगातील सर्व प्रकारचे विषय आता मोबाईलच्या एका बटणावर आले आहेत.इंटरनेटचा स्पीडही वाढला आहे.मनोरंजनाची सर्व प्रकारची साधने या छोट्याशा दिसणाऱ्या मोबाईलवर उपलब्ध होऊ लागली आहेत.त्यामुळे साहजिकच मोबाईलचा वापर वाढला आहे.

#### एका ठिकाणी जमूनही एकत्र नाही

मोबाईलचा वापर वाढण्याचा परिणाम पारावरील गप्पांवरही झाला आहे.एका ठिकाणी जमून गप्पा मारणे कमी झाले आहे.आज पारावर जमले तरी ज्याच्या त्याच्या हातात मोबाईल दिसू लागला आहे.या पारावरील लोक एकाच ठिकाणी बसूनही एकत्र नसल्याचे चित्र दिसत आहे.

#### गप्पांचे क्लब सुरू करणे गरजेचे

काळ बदलला आहे. एका घरात राहूनही लोक एकमेकांशी कनेक्टेड नसतात. पूर्वी गप्पा मारण्यासाठी व वेगवेगळे खेळ खेळण्यासाठी क्लब निर्माण केले जायचे. तसे गावोगावी,शहरा-शहरात छोटे छोटे गप्पांचे क्लब सुरू करण्याची गरज आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदार संघात मतमोजणीसाठी यंत्रणा सज्ज- जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकींतर्गत जिल्ह्यातील सर्व चार लोकसभा मतदार संघाची मतमोजणी येत्या ४ जून रोजी होत असून मतमोजणीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली.

डॉ. दिवसे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील, रोहिदास पवार, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर आदी उपस्थित होते.

बारामती आणि पुणे लोकसभा मतदार संघांची मतमोजणी कोरेगाव पार्क येथील भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामध्ये, शिरुर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी रांजणगाव, ता. शिरुर येथील महाराष्ट्र औद्योगिक वखार महामंडळाच्या गोदामामध्ये तर मावळ लोकसभा मतदार संघाची मतमोजणी शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथील वेटलिफ्टिंग हॉलमध्ये होणार आहे.

सकाळी ईव्हीएम यंत्रे आणि टपाली मतपेट्या ठेवलेल्या सुरक्षा कक्षांचे (स्ट्राँग रुम) सील निवडणूक निरीक्षक, निवडणूक निर्णय अधिकारी आदी तसेच उमेदवार आणि उमेदवारांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत काढल्यानंतर आवश्यक ती प्रक्रिया करुन मतमोजणीला प्रारंभ केला जाईल. प्रारंभी सकाळी ८ वाजता टपाली मतदान आणि ईटीपीबीएस मतांची मोजणी सुरू होईल. ईव्हीएमच्या मतमोजणीची सुरूवात ८ वाजून ३० मिनिटांनी होईल. मतमोजणी कक्षातील सर्व कामकाजाचे सीसीटीव्हीद्वारे संपूर्ण रेकॉर्डिंग करण्यात येणार असून याशिवाय व्हिडीओ कॅमेराद्वारेही चित्रीकरण करण्यात येणार आहे.

मतमोजणी केंद्रात मोबाईलआणण्यास मनाई

निवडणूकीच्या मतमोजणीची फेरीनिहाय आकडेवारी मतमोजणी केंद्राच्या ठिकाणाहून ध्वनीक्षेपकाद्वारे वेळोवेळी घोषित केली जाईल. मतमोजणी केंद्रामध्ये उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी यांना मोबाईल सोबत बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. वैध ओळखपत्र नसलेल्या कुठल्याही अनधिकृत व्यक्तीला मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.

मतमोजणीसाठी टेबल आणि फेऱ्यांची रचना

प्रत्येक लोकसभा मतदार संघात विधानसभा मतदारसंघनिहाय स्वतंत्रपणे मतमोजणी टेबल लावण्यात येणार आहेत. मावळ लोकसभेची मतमोजणी प्रक्रिया ११६, पुणे लोकसभा ११२, बारामती-१२४ व शिरुर लोकसभा निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया ११२ टेबलद्वारे होणार आहे. मावळ मधील पनवेल आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी प्रत्येकी २४ टेबल लावण्यात येणार असून मतमोजणीसाठी २३ फेऱ्या होणार आहेत. कर्जत आणि उरण विधानसभा मतदारसंघासाठी प्रत्येकी १४ टेबल आणि २४ फेऱ्या तर मावळ आणि पिंपरी विधानसभा मतदार संघासाठी १६ टेबल लावण्यात येणार मावळसाठी २४ तर पिंपरीसाठी २५ फेऱ्या होणार आहेत. तसेच पोस्टल व ईटीपीबीएस मतमोजणीसाठी ८ टेबल लावण्यात येणार आहेत.



पुणे लोकसभाअंतर्गत वडगाव शेरी २२, शिवाजीनगर, पुणे कॅन्टोंमेंट, कसबा पेठ प्रत्येकी १४, कोथरुड २० तर पर्वती विधानसभा मतदार संघ क्षेत्रासाठी १८ टेबलवर मतमोजणी होणार असून पोस्टल व ईटीपीबीएस मतमोजणीसाठी १० टेबलची व्यवस्था असेल. वडगाव शेरी २१, शिवाजीनगर, कोथरुड, पर्वती, कसबा पेठ व पुणे कॅन्टोंमेंटसाठी प्रत्येकी २० फेऱ्यांमध्ये मतमोजणी होईल.

बारामती लोकसभा मतदार संघातील दौंड मतदारसंघासाठी १४ टेबल व २३ फेऱ्या, इंदापूर १६ टेबल व २१ फेऱ्या, बारामती १८ टेबल व २२ फेऱ्या, पुरंदर २० टेबल व २२ फेऱ्या, भोर २४ टेबल व २४ फेऱ्या तर खडकवासला विधानसभा मतदार संघासाठी २२ टेबल व २४ फेऱ्या होतील. शिरुर लोकसभा मतदार संघातील जुन्नर मतदारसंघासाठी १४ टेबल व २५ फेऱ्या, आंबेगाव १४ टेबल व २४ फेऱ्या, खेड-आळंदी १६ टेबल व २४ फेऱ्या, शिरुर १६ टेबल व २७ फेऱ्या, भोसरी २० टेबल व २३ फेऱ्या तर हडपसर विधानसभा मतदार संघासाठी २० टेबल व २६ फेऱ्या होतील. पोस्टल व ईटीपीबीएस मतमोजणीसाठी १२ टेबल लावण्यात येणार आहेत. मतमोजणीसाठी मनुष्यबळाची नियुक्ती ईव्हीएम मतमोजणीसाठी एकूण ६५६ मतमोजणी सहायक, ६०० मतमोजणी पर्यवेक्षक आणि ६४० सूक्ष्म निरीक्षक असे एकूण १ हजार ८९६ मनुष्यबळ तर टपाली व ईटीपीबीएस मतमोजणीसाठी ४७ मतमोजणी पर्यवेक्षक, ६९ मतमोजणी सहायक आणि ५८ सूक्ष्म निरीक्षक असे १७४ याप्रमाणे एकूण २ हजार ७० मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे.

मावळ लोकसभा मतदार संघाच्या ईव्हीएम मतमोजणीसाठी १६२ मतमोजणी सहायक, १३७ मतमोजणी पर्यवेक्षक आणि १५८ सूक्ष्म निरीक्षक, पुणे लोकसभेसाठी १६८ मतमोजणी सहायक, १५९ मतमोजणी पर्यवेक्षक आणि १६३ सूक्ष्म निरीक्षक, बारामतीसाठी १६४ मतमोजणी सहायक, १५२ मतमोजणी पर्यवेक्षक आणि १५३ सूक्ष्म निरीक्षक, शिरुरसाठी १६२ मतमोजणी सहायक, १५२ मतमोजणी पर्यवेक्षक आणि १६६ सूक्ष्म निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. पोस्टल व ईटीपीबीएस मतमोजणीसाठी मावळ लोकसभा मतदार संघात १४ मतमोजणी सहायक, ७ मतमोजणी पर्यवेक्षक आणि ८ सूक्ष्म निरीक्षक, पुणे लोकसभेसाठी १९ मतमोजणी सहायक, १२ मतमोजणी पर्यवेक्षक आणि १४ सूक्ष्म निरीक्षक, बारामतीसाठी २० मतमोजणी सहायक, १० मतमोजणी पर्यवेक्षक आणि १८ सूक्ष्म निरीक्षक तर शिरुर लोकसभा मतदार संघासाठी १६ मतमोजणी सहायक, प्रत्येकी १८ मतमोजणी पर्यवेक्षक आणि सूक्ष्म निरीक्षक यांची नेमणूक करण्यात आली आहे.

वाहनतळ व्यवस्था

पुणे व बारामती लोकसभा मतदार संघाच्या मतमोजणीसाठी येणारे मनुष्यबळ व उमेदवार तसेच उमेदवारांचे प्रतिनिधी, नागरिक यांच्यासाठी वाहनतळाची पुरेशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. पुज्य कस्तुरबा गांधी शाळा नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क येथे ६०० ते ७०० वाहनक्षमता असलेले दुचाकी वाहनतळ फक्त अधिकारी- कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच नागरिकांसाठी रोही व्हिला लॉन्स लेन नं.७, कोरेगाव पार्क येथे ६०० ते ७०० वाहनक्षमतेचे दुचाकी व चारचाकी वाहनतळ तर द पूना स्कूल न्ड होम फॉर द ब्लाईंड ट्रस्ट, नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क येथे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरिकांसाठी ८०० ते ९०० वाहनक्षमता असलेल्या चारचाकी वाहनतळाचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय सदर दिवशी वाहतुकीला अडथळा येऊन वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी वाहतूक वळविण्याचे आदेश पोलीस प्रशासनास दिले आहेत. मतमोजणीसाठी येणाऱ्या सर्व घटकांना कोणतीही असुविधा होणार नाही यासाठी निवडणूक प्रशासन सर्व ती काळजी घेत असून नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहनही डॉ. दिवसे यांनी केले आहे.

# पुणे जिल्हाधिकाऱ्यांवर प्रांताधिकाऱ्यांचे गंभीर आरोप;

## मतमोजणीपूर्वी बदली करण्याची मागणी केल्याने प्रचंड खळबळ!

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्यावर खेड-आळंदीचे प्रांताधिकारी आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी जोगेंद्र कट्यारे यांच्याद्वारे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. जोगेंद्र कट्यारे यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहीत पुण्याचे जिल्ह्याधिकारी सुहास दिवसे हे खेड आळंदीचे आमदार यांच्या प्रभावाखाली काम करत असल्याचा आरोप केला आहे.

सुहास दिवसे हे मागील अनेक वर्षे कृषी आयुक्त, क्रिडा आयुक्त, पीएमआरडीए चे संचालक अशा विविध पदांवर काम करत पुण्यातच ठाण मांडून आहेत. त्यासाठी त्यांनी त्यांच्या राजकीय हितसंबंधाचा आधार घेतला असल्याचा आरोप जोगेंद्र कट्यारे यांनी केला आहे.

सुहास दिवसे यांनी माझ्या कार्यकाळात झालेल्या जमिन अधिग्रहण प्रकरणांची आधीच चौकशी सुरू केलेली असताना २८ मे रोजी त्यांनी खेडच्या तहसील कार्यालयात पुन्हा छापा घातला. सुहास दिवसे यांनी हे सर्व खेड आळंदीच्या आमदारांच्या प्रभावातून केले असल्याचे त्यांनी म्हंटले आहे.

कट्यारे यांनी आमदारांचे थेट नाव घेतलेले नाही मात्र खेड- आळंदीला आमदार अजित पवार गटाचे दिलीप मोहिते आहेत. त्यांच्या प्रभावातून सुहास दिवसे काम करत आहेत. तसेच सुहास दिवसे हे जाणीवपूर्वक आपल्याला त्रास देत आहेत. आमदार त्यांचे हितसंबध जोपसण्यासाठी दिवसे यांचा वापर करत आहे, असे कट्यारे यांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या पत्रात म्हंटले आहे.

सुहास दिवसे हे राजकीय प्रभावातून काम करत असून मतमोजणी आधी त्यांची बदली करावी अशी मागणी खेडचे प्रांताधिकारी आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी जोगेंद्र कट्यारे यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे . कट्यारे यांच्या या आरोपांमुळे एकच खळबळ उडाली आहे.

# पिंपरी येथील मार्केटमध्ये नामांकित कंपनीच्या बनावट कपड्यांची विक्री, १० लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपरी साई चौकातील शिव गारमेंट्स, संजय ट्रेडलिंक या दोन दुकानातून १० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ब्रँडेड कंपनीचा लोगो वापरुन बनावट कपड्यांची विक्रीप्रकरणी या दोन दुकानदारांवर कॉपीराईट ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई गुरुवारी (दि.३०) दुपारी दोन ते सायंकाळी साडेपाच या वेळेत करण्यात आली. या कारवाईत

याप्रकरणी महेश विष्णू कांबळे (वय-४१ रा. जनवाडी, शिवाजीनगर, पुणे) यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. विष्णू कांबळे यांच्या तक्रारीवरून संजय चंद्रकांत भोजवानी (रा. ज्योतीबा मंगल कार्यालयाजवळ, काळेवाडी, पिंपरी) व संजू दिलीप बसतांनी (रा. एसके पलास पॅराडाईज, नव महाराष्ट्र शाळेजवळ, पिंपरी) यांच्या विरोधात कॉपीराइट कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महेश विष्णू हे युनायटेड अँड युनायटेड ट्रेडमार्क अँड ॲथोरिटी नवी दिल्ली या कंपनीत तपासी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कंपनीकडून कॉपी राईट हक्काचे कोणी उल्लंघन करत असेल तर त्याच्या विरोधात कॉपीराईट कायदा व ट्रेडमार्क कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात येते. सध्या त्यांच्या कंपनीकडे अंडर आर्मर, नायके, जॉर्डन या विदेशी ट्रेडमार्क कंपनीचे अधिकृत कॉपीराईट व ट्रेडमार्क कायद्याप्रमाणे कारवाई करण्याचे अधिकार आहेत. दरम्यान, पिंपरी कॅम्प येथे काही दुकानांमध्ये अंडर आर्मर, नायके, जॉर्डन कंपनीचा बनावट लोगो वापरुन कपडे विक्री होत असल्याची माहिती त्यांना मिळाली. फिर्यादी यांनी पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलिसांनी फिर्यादी यांच्यासह साई चौक परिसरातील दुकानात जाऊन पाहणी केली असता बनावट कपड्याची विक्री केली जात असल्याचे समोर आले.

आरोपींनी त्यांच्या दुकानात फिर्यादी यांच्या कंपनीचे स्वामित्व असलेल्या अंडर आर्मर, नायके, जॉर्डन कंपनीचे बनावट टी शर्ट, शॉर्ट पॅन्ट, ट्रॅक पॅन्ट, जॅकेट विक्री करताना व विक्रीसाठी ठेवल्या असताना आरोपी मिळून आले. या कारवाईत पोलिसांनी १० लाख ३१ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपास वरीष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कडलग करीत आहेत.

# संगमनेरात आव्हाड यांच्या प्रतिमेला जोडेमारो आंदोलन

**पुणे । प्रतिनिधी**

महाड येथील चवदार तळ्याच्या परिसरातील आंदोलनादरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र फाडून विटंबना केल्याप्रकरणी राष्ट्रवादी (शरद पवार गटाचे) आ. जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेला संगमनेरात जोडे मारो आंदोलन करुन, या कृत्याचा निषेध करण्यात आला. दरम्यान, यावेळी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आ. आव्हाड यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

'आव्हाड यांना स्टंट करण्याची सवय'

महाड येथील घटनेचा निषेध नोंदविण्यासाठी महायुतीने छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केले. नंतर बस स्थानक चौकात जोडे मारो आंदोलन करण्यात आले. जी मनुस्मृती डॉ. आंबेडकर यांनी जाळली. तीच मनुस्मृती आ. जितेंद्र आव्हाड यांनी बुधवारी महाडमध्ये जाळली, मात्र मनुस्मृती दहण करण्याच्या नादात अनावधानाने डॉ. आंबेडकर यांचे छायाचित्रदेखील त्यांच्याकडून फाडले गेले. हा प्रकार लक्षात येताच आ. आव्हाड यांनी जाहीर माफी मागितली, मात्र याचे पडसाद सर्वत्र उमटत आहेत. आ. आव्हाड यांना नेहमी स्टंटबाजी करण्याचे सवय लागली आहे. प्रत्येकवेळी ते अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, असा आरोप पदाधिकार्यांनी केला.

महायुतीचं 'जॉइंट' आंदोलन

आंदोलनप्रसंगी भाजपाचे संगमनेर विधानसभा निवडणूक प्रमुख अमोल खताळ, शहराध्यक्ष ॲड. श्रीराम गणपुले, तालुकाध्यक्ष वैभव लांडगे, हरिश्चंद्र चकोर, गोकुळ दिघे, सिताराम मोहरीकर, राहुल भोईर, बुवाजी खेमनर, रोहिदास साबळे, दीपक भगत, हरीश वलवे, शरद गोर्डे, सोमनाथ नेहे, रोहिदास गुंजाळ, घनःश्याम भारस्कर, नवनाथ कानकाटे, वरद बागुल, विकास जाधव, महेश मांडेकर, संजय वाक्चौरे, सतीश गोपाळे, श्यामसुंदर जोशी, प्रशांत कोल्हे, रणजीत गायकवाड, ओंकार कातोरे, कमलेश डेरे, गणेश सोनवणे, गणेश पावसे, अरुण थिटमे, विकास गुळवे, सुयोग गुंजाळ, संजय कवडे, ऋतिक निळे, घनः श्याम भोसले, गोपीचंद गुंजाळ, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, अक्षय भालेराव, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तुषार ठाकूर आदींसह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आ. आव्हाडांविरुद्ध देशद्रोहासह ॲट्रॉसिटी दाखल करा

महाड येथील आंदोलनादरम्यान त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या छायाचित्रांचा मान राखणे अपेक्षित होते, मात्र स्टंटबाजी करण्याच्या नादात त्यांना विसर पडला, असा आरोप यावेळी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी केला. दरम्यान, आ. आव्हाड यांच्या विरोधात देशद्रोहासह ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी पोलिस अधीक्षक राकेश ओला व संगमनेरचे पो. नि. भगवान मथुरे यांच्याकडे केली.

# अगरवाल बाप-लेकाला चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी

**पुणे । प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणात आरोपी अल्पवयीन मुलाचा गुन्हा अंगावर घेण्यासाठी चालकाचे अपहरण करून त्याला बंगल्यात डांबून ठेवल्याप्रकरणी आरोपी सुरेंद्रकुमार अगरवाल आणि विशाल अगरवाल यांना न्यायालयाने चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे या बापलेकाचा मुक्काम आता येरवडा कारागृहात असणार आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. ए. पांडे यांनी हा आदेश दिला.

'पोर्शे' कार भरधाव चालवून तरुण-तरुणीच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन मुलाचा गुन्हा स्वत:च्या अंगावर घेण्यासाठी चालकाचे अपहरण करून त्याचा मोबाइल फोन काढून धमकावल्याप्रकरणी सुरेंद्रकुमार ब्रह्मदत्ता अगरवाल (वय ७७) आणि विशाल सुरेंद्रकुमार अगरवाल (वय ५०, दोघे रा. बंगला क्रमांक एक, ब्रह्मा सनसिटी, वडगाव शेरी) यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३४२ (चुकीच्या पद्धतीने कैदेत ठेवणे), कलम ३६५ (अपहरण), कलम ३६८ (बेकायदा लपवून ठेवणे किंवा डांबून ठेवणे), कलम ५०६ (धमकावणे) आदी कलमांनुसार गुन्हा दाखल आहे.

न्यायालयीन कोठडी झाल्याने आरोपी सुरेंद्रकुमार अगरवाल व विशाल अगरवाल यांना जामीनासाठी अर्ज करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अल्पवयीन मुलाला कार चालविण्यास दिल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात विशाल अगरवाल याने जामीनासाठी अर्ज केला आहे.

# मनोज जरांगे पाटलांना न्यायालयाकडून ५०० रुपयांचा दंड

**पुणे । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्याविरोधात पुणे न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट बजावले होते. हे वॉरंट रद्द करण्यासाठी जरांगे स्वत: शुक्रवारी न्यायालयात हजर झाले. त्यांनी न्यायालयासमोर जाऊन हे वॉरंट रद्द करण्याची विनंती केली. न्यायालयाने त्यांना ५०० रुपयांचा दंड आणि यापुढील सुनावणीला उपस्थित राहण्याच्या अटीवर हे वॉरंट रद्द केले. कोथरूड पोलीस ठाण्यात भादवि ४२०, ४०६ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात हे वॉरंट बजावण्यात आले होते.

मनोज जरांगे आणि अन्य दोघांवर कोथरूड पोलीस ठाण्यात २०१३ साली भादवि ४२०, ४०६ अन्वये फसवणूक व अपहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी धनंजय जयसिंग घोरपडे (रा. वारजे, कोथरूड) यांनी फिर्याद दिली होती. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी धनंजय घोरपडे हे नाटककार आहेत. ते स्वत: नाटक निर्माते आणि सादरकर्ते देखील आहेत. तयांनी 'शंभूराजे' नावाच्या नाटकाची निर्मिती केली होती. जरांगे पाटील आणि आणखी दोन व्यक्तींनी घोरपडे यांच्याशी संपर्क साधत 'शंभूराजे' नाटकाचे जालना येथे सहा प्रयोग करण्याची विनंती केली होती. प्रत्येक प्रयोगाचे पाच लाख याप्रमाणे ३० लाख रुपये देण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे त्यांच्यात करारनामा देखील झाला होता. ठरल्याप्रमाणे २०१३ साली एक महिन्यात सहा प्रयोग करण्यात आले. मात्र, या प्रयोगांचे पूर्ण पैसे फिर्यादीला देण्यात आले नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

जरांगे पाटील आणि अन्य दोघांनी फिर्यादी यांना दिलेले १३ लाख रुपयांचे धनादेश वटले (बाऊन्स) नाहीत. धनादेश न वटल्यामुळे या रकमेची त्यांनी मागणी केली. परंतु, हे पैसे मिळाले नाहीत असे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. फिर्यादीने न्यायालयाकडे यासंबंधी तक्रार दाखल केली होती. न्यायालयाने त्यावेळी पोलिसांना कलम १५६ (३) प्रमाणे गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, कोथरूड पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयाने यापूर्वी या प्रकरणात जरांगे पाटील यांना दोन वेळा समन्स बजावले होते. मात्र, मराठा आरक्षणासंबंधीचे आंदोलन आणि दौरे यामुळे त्यांना उपस्थित राहता आलेले नव्हते. दोन वेळा अनुपस्थित राहिल्याने न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट बजावले होते. हे वॉरंट रद्द करण्यासाठी जरांगेपाटील न्यायालयात हजर झाले होते.

जरांगे पाटील यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की 'न्यायालयाच्या समोर सर्व समान आहेत. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी मी न्यायालयात हजर झालो आहे. न्यायालयापेक्षा कोणीही मोठा नाही. न्यायालयाने आदेश दिल्यामुळे मी लगेच उपस्थित झालो आहे. याविषयी अधिक बोलणे योग्य होणार नाही. गुन्हा न्यायालयात सिद्ध व्हायचा आहे. आरोप खरे की खोटे हे न्यायालयाच्या निकालानंतर स्पष्ट होईलच. माझ्यावर खोटे आरोप करण्यात आलेले आहेत. माझ्याबाबत कुठेच काही सापडत नाही म्हटल्यावर या खटल्यात काही सापडतेय असा प्रयत्न सरकारचा आहे. परंतु, न्यायदेवता न्याय करेल.' असे ते म्हणाले.

याविषयी सरकारी वकील ॲड. नीलिमा इथापे म्हणाल्या, न्यायालयाने मनोज जरांगे पाटील यांना अजामीनपात्र वॉरंट बजावण्यात आले होते. त्यानुसार, जरांगे हे न्यायालयासमोर हजर झाले. न्यायालयाने त्यांना ५०० रुपयांचा दंड केला असून पुढील सुनावणीला वेळोवेळी हजर राहण्याच्या अटीवर हे वॉरंट रद्द करण्यात आल्याचे त्या म्हणाल्या.

# डॉ.विश्वनाथ कराड हेच एक विद्यापीठ : पद्मविभूषण डॉ.रघुनाथ माशलेकर: 'विश्वशांतीरत्न' पुरस्काराचे वितरण

पुणे । प्रतिनिधी

शतकभरापूर्वी शिकाको शहरात भारत विश्वगुरू होणार हे स्वामी विवेकानंदांनी पाहिलेले स्वप्न, सत्यात उतरविण्याचा संकल्प घेतलेले प्रा.डॉ.विश्वनाथ कराड हे खऱ्याअर्थाने नवनिर्मितीचा एक प्रचंड मोठा स्त्रोत आहेत. 'पॉलिमर इंजिनिअरिंग' ही संकल्पना कोणीही मांडली नसताना, डॉ.कराड ती माझ्याकडे घेवून आले. त्यावेळी आपण, तिर्थक्षेत्रांकडून ज्ञानक्षेत्रांकडे वळायला हवे, अशी मी मांडलेली संकल्पना डॉ.कराडांनी सत्यात उतरवून दाखवली. त्यामुळे अखंड विश्वाला शांतीचा संदेश देणारे डॉ.कराड हे मला नवनिर्मितीचे एक विद्यापीठच वाटतात, अशी भावना जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ.रघुनाथ ए. माशलेकर यांनी व्यक्त केले.

पुणे शहरातील विविध सामाजिक संस्था व समस्थ पुणेकरांच्या वतीने माईर्स एमआयटी शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ.विश्वनाथ दा.कराड यांचा 'विश्वशांतीरत्न' या नागरी पुरस्काराने गौरव करण्यात आला. तसेच, सीओईपी टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघटनेच्यावतीने डॉ.कराडांचा 'जीवनगौरव' पुरस्कारानेही गौरव करण्यात आला. सीओईपीच्या सभागृहात झालेल्या समारंभात डॉ. माशलेकर बोलत होते.

याप्रसंगी, जगप्रसिद्ध संगणक शास्त्रज्ञ डॉ.विजय भटकर, सिक्कीमचे माजी राज्यपाल खा.श्रीनिवास पाटील, पंडीत वसंत गाडगीळ, ह.भ.प. बापूसाहेब मोरे, नॅकचे माजी चेअरमन डॉ.भूषण पटवर्धन, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस, माजी आ.उल्हास दादा पवार, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुनील बिरूड, डॉ.राजेंद्र शेंडे, डॉ.प्रमोद चौधरी, आचार्य रतनलाल सोनाग्रा, डॉ.एन.एस.पठाण, सीओईपी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष भरत गित्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ.माशलेकर यांनी यावेळी, पुण्यात नुकत्याच घडलेल्या 'हिट अँड रन' प्रकरणावरही टिपण्णी करताना, आजच्या युवापीढीला मुल्यसंवर्धनाचे महत्व पटवून देण्याची गरज असल्याची भावनाही व्यक्त केली.

याप्रसंगी बोलताना डॉ. भटकर म्हणाले, स्वामी विवेकानंदांनी शिकागोतील ज्या सभागृहात १३१ वर्षांपूर्वी भाषण केले, तिथेच डॉ.कराडांना भाषण करण्याची संधी मिळाली यापेक्षा अभिमानाची गोष्ट ती कोणती? त्यामुळे, सध्याच्या काळाता त्यांच्याप्रमाणे विश्वशांतीचा दूत शोधूनही सापडणार नाही, असे गौरोवोद्गारही त्यांनी काढले. यावेळी बोलताना, डॉ. सबनीस यांनी 'रामकृष्ण हरीच्या जपात डीलीट पदवी स्विकारणारे, डॉ.विश्वनाथ कराड' असा उल्लेख करत आपल्या भाषणाची सुरुवात केली. पुढे ते म्हणाले की, डॉ.कराडांनी केलेल्या विश्वशांती दौऱ्यात सर्वधर्मांच्या धार्मिक स्थळांना भेटीगाठी दिल्या. त्यामुळे विश्वशांतीसाठी सर्व देशांच्या, खंडांच्या सिमारेषा ओलांडून केले गेलेले त्यांचे प्रयत्न नक्कीच इतिहासात नोंद घेण्यायोग्य आहेत.




डॉ.कराड हे विज्ञाननिष्ठ आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्याची नोंद घेवून अमेरिकेतील विद्यापीठाने त्यांना बहाल केलेली डॉक्टरेट नक्कीच सर्व भारतीयांसाठी गौरवाची बाब आहे, असेही ते म्हणाले.

नॅकचे माजी चेअरमन डॉ.पटवर्धन, यांनी देखील डॉ.कराडांना शुभेच्छा देताना, त्यांच्या कार्याचा ओझरता आढावा घेतला. तसेच पंडीत वसंत गाडगीळ यांनी संस्कृत भाषेत मनोगत व्यक्त करताना सभागृहातील सर्वांना मंत्रमुग्ध केले. तसेच, डॉ.कराडांचा झालेला हा सन्मान सबंध वारकरी समुदायाचा सन्मान आहे, अशी भावना संत तुकाराम महाराज देवस्थानचे माजी अध्यक्ष ह.भ.प. बापूसाहेब मोरे यांनी यावेळी व्यक्त केली.

'दिंडी'मध्ये 'थंडी' वाजत नाही

'आम्ही एकनाथाचे भक्त आहोत. वारी आम्हाला माहितीय... मारीही आम्हाला माहितीय. परंतू एक सांगतो, 'दिंडी'मध्ये 'थंडी' वाजत नाही. वारीमध्ये केवळ माऊली, असे म्हटले की, गर्दीत सावलीसारखी वाट सापडते. अगदी तिच सावली अंगावर घेवून वारकऱ्यांसाठी झटणारा हा आमचा विश्वनाथ!,' असे म्हणत खासदार श्रीनिवास पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच, आपल्या मित्राला एवढा मोठा पुरस्कार मिळाल्याचा अतिव आनंद झाला, असेही ते यावेळी म्हणाले.

तरुणाईवर ज्ञानोबा-तुकोबांचा संस्कार व्हावा

उल्हास दादा पवार डॉ.कराडांसोबतच्या अनेक आठवणींना यावेळी उजाळा देताना म्हणाले, एमआयटी शिक्षक संस्था मुल्याधिष्ठीत शिक्षणपद्धीतीद्वारे लाखो विद्यार्थांना घडवित आहे. त्याची प्रेरणा खऱ्याअर्थाने डॉ.कराडांना त्यांच्या भगिनी प्रयागाअक्कांकडून मिळाली. त्यामुळे डॉ.कराड त्याच प्रेरणेने आणि निष्ठेने कार्यरत आहेत. सध्या शिक्षणनगरी पुण्यातील वातावरण पाहाता, येथील तरुण पीढीवर ज्ञानोबा-तुकोबांचा संस्कार व्हावेत असे वाटते. कारण, याच संस्कारांच्या दिंडीचे पाईक असणाऱ्या डॉ.कराडांचा आज होणाऱ्या सन्मानामागील भाव नक्कीच तरुणांसाठी प्रेरणादायी असेल, असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

सीओईपीने मला घडविले- डॉ.कराड

आपल्या पुरस्काराच्या उत्तरात डॉ.कराड यांनी सीओईपीतील त्यांच्या आठवणींना उजाळा देताना, सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले, या सभागृहात प्रवेश करण्यापूर्वी मी माझ्या मॅकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाला भेट दिली. कारण, या विभागाचा आणि एकंदर सीओईपीचा माझ्या जडणघडणीत फार मोठा वाटा आहे. तसेच माझ्या आयुष्यात डॉ.माशलेकर आणि डॉ.भटकर यांनी केलेले मार्गदर्शनही अत्यंत मोलाचे होते. त्यामुळे समस्त पुणेकरांच्या वतीने झालेल्या या सन्मानाने माझे उर भरून आले आहे, असे मत डॉ.कराड यांनी यावेळी मांडले.